# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹


## नेरळ रस्त्यावर धामोते परिसरात गोळीबार

**नेरळ :** पोलीस ठाण्याच्या हद्दीत धामोते येथे जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करताना पिस्तुलातून गोळीबार केला. बदलापूर येथून घरी परतत असताना एका भाडेकरु व्यक्तीवर गोळीबार झाला असून, जखमी व्यक्तीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धामोते येथील श्री स्वामी समर्थ चाळीमध्ये राहणारे सचिन अशोक भवर हे बदलापूरजवळील मानकिवली येथील एमआयडीसीमध्ये नोकरीस आहेत. ते दररोज सकाळी सहा ते नऊ या वेळेत नोकरीच्या ठिकाणी असतात. ते पेशवाई रस्त्याने २५ नोव्हेंबर रोजी रात्री सव्वानऊ वाजता आपल्या स्कुटीवरून घरी परतत असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या सीबीझेड या गाडीने पान २ वर

## बेलपाड्यात बिबट्याचा वावर

**उरण :** जेएनपीए बंदरालगत असलेल्या बेलपाडा परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरातील काही नागरिकांना बिबट्या दिसला असल्याची माहिती समोर येत आहे. तरी, नागरिकांनी सतर्कता बाळगणे गरजेचे असल्याचे आवाहन वन विभागाकडून करण्यात येत आहे. पनवेल तालुक्यातील नितळस गाव परिसरात नुकताच बिबट्याचा मुक्त संचार आढळून आला आहे. तसेच उरण तालुक्यात मागील वर्षी बिबट्या आढळून आला होता. सध्या राज्यात बिबट्यांची संख्या वाढली असून, नागरिकांवर प्राणघातक हल्ले केल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. पान २ वर

# शेकापला मिळाला 'खटारा'

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**जिल्ह्यात नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर चिन्ह वाटप प्रक्रिया बुधवारी सकाळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात राबविण्यात आली. मात्र, यावर भाजपच्या एका व्यक्तीने शेकापला खटारा चिन्ह वाटप करण्यावर आक्षेप घेतला. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी हा आक्षेप फेटाळून लावला. ॲड. सचिन जोशी यांनी केलेले युक्तीवाद आणि दाखविलेल्या पुराव्यानुसार शेकापला खटारा चिन्ह निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले असल्याचे ॲड. जोशी यांनी सांगितले.**

या निर्णयामुळे विरोधकांचे धाबे चांगलेच दणाणले. शेकापचे पूर्वीचे चिन्ह परत मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. तर, विरोधकांच्या आनंदावर विरझण पडले. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या बिनविरोध निवडीनंतर शेकापने चिन्ह मिळविण्यातही विजय मिळविला आहे. याची विरोधकांनी चांगलीच धास्ती घेतली असल्याची चर्चा दिवसभर सर्वत्र सुरु होती.




अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या रिंगणात महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार उभे राहिले आहेत. थेट नगराध्यक्षपदासाठी अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदीप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

### खटारा, हाताचा पंजा चिन्ह

अलिबाग नगरपालिकेचे मतदान दोन डिसेंबरला होणार असून, मतमोजणी तीन डिसेंबरला आहे. बुधवारी दुपारीपर्यंत उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. शेकाप उमेदवारांसाठी 'खटारा' आणि काँग्रेस उमेदवारांसाठी 'हाताचा पंजा' चिन्ह मिळाले आहे. महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेस उमेदवारांना खटारा, हाताचा पंचा चिन्ह मिळाले असल्याने आनंद व्यक्त करण्यात आला.

> शेतकरी कामगार पक्षाचे खटारा चिन्ह आहे. हे चिन्ह निवडणुकीसाठी मिळाल्याने खूप आनंद झाला आहे. हे चिन्ह सर्वांचे परिचित आहे.
> – **विजय गिदी,** शेकाप तालुका चिटणीस, मुरूड

अर्ज माघार प्रक्रियेनंतर बुधवारी (दि.२६) चिन्ह वाटप प्रक्रिया प्रशासनाकडून राबविण्यात आली. दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाला खटारा चिन्ह देऊ नये, याबाबत भाजपच्या पल्लवी जोशी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना अर्ज केला होता. खटारा चिन्ह वाटपाबाबत त्यांनी आक्षेप घेतला होता. मात्र, त्यांचा हा आक्षेप फेटाळण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आक्षेप ग्राह्य धरला नाही. शासनाचे पाच मे २०२५ रोजी परिपत्रक आले होते. यानंतर चिन्ह वाटपाबाबत सुधारित परित्रक २५ नोव्हेंबरला काढण्यात आले. या परिपत्रकामध्ये चिन्ह वाटप मागणीप्रमाणे द्या, असे नमूद करण्यात आले. त्यामुळे जोशी यांचा आक्षेप ग्राह्य धरला नाही. याबाबत ॲड. सचिन जोशी यांनी केलेला युक्तीवाद व सादर केलेल्या पुराव्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी शेकापला खटारा चिन्ह वाटप केले असल्याची माहिती ॲड. सचिन जोशी यांनी दिली.



● अलिबाग नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. ६ मधील नगरसेवकपदाचे उमेदवार ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. ऋषीकेश माळी यांच्या प्रचारार्थ मोघे खानावळीचे मालक उमेश मोघे यांची भेट घेतली. यावेळी शेकाप सरचिरणीस जयंत पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते नागेश कुलकर्णी, कांचन कदम, सौ. मानकर आदी उपस्थित होते.

## वेधक

### महिलेचा तरुणावर अत्याचार

**पुणे :** पुण्यातील कोथरूड भागात महिलेने गुंगीचे औषध पाजून अत्याचार केल्याचा गंभीर आरोप एका तरुणाने केला आहे. याबाबत तरुणाने कोथरूड पोलिसांकडे तक्रार दाखल करताच या प्रकरणाचा तपास सुरू झाला आहे. महिलेने पुरुषावर अत्याचार केल्याच्या या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. तरुणाने दिलेल्या तक्रारीनुसार, महिला स्वत:ला वकील असल्याचा आव आणत होती. कायद्याची भीती दाखवत ती तरुणाला वारंवार धमकावत असल्याचे तरुणाने सांगितले आहे. महिला त्याला गुंगीचे औषध देऊन त्याच्यावर अत्याचार करत असल्याचे तरुणाने तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

### ग्रामसेवकाने जीवन संपवलं

**सोलापूर :** वरिष्ठ अधिकाऱ्याच्या त्रासाला कंटाळून ग्रामसेवकाने आत्महत्या केल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पीडित कुटुंबियांनी न्यायासाठी पोलिसांत धाव घेतली. मात्र, पोलिसांनी गुन्हा दाखला करता येत नसल्याचे सांगतिले. पीडित ग्रामसेवकाच्या कुटुंबियांनी जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे म्हटले. उपमुख्य अधिकाऱ्यांच्या नावाने कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मानसिक त्रास देत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. दरम्यान, याप्रकरणी आम्हाला गुन्हा दाखल करता येणार नाही, तुम्ही रितसर जबाब नोंदवा, असे येथील पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी म्हटले.

### मतदार याद्यांतील सूचना व हरकतीला मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी अंतिम टप्प्यात असून, आता जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकांचे वेध सर्वांनाच लागले आहेत. त्यासाठी, राजकीय पक्षदेखील कामाला लागले आहेत. निवडणूक आयोगाने यापूर्वी प्रारुप मतदार याद्या जाहीर केल्या आहेत. मात्र, या मतदार याद्यांमध्ये अद्यापही घोळ आणि दुबार मतदारांची संख्या मोठी असल्याने आता नव्याने मतदार प्रारुप याद्या तयार करण्यात येणार आहेत. आता, मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम आयोगाकडून जाहीर करण्यात आलाय. यापूर्वी अंतिम मतदार यादीसाठी ५ डिसेंबर ही तारीख होती, आता २० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## शिवशाही-ट्रकला भीषण अपघात

### एक ठार, दहा जखमी | महामार्गावरील माणगावजवळील घटना

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगावपासून एक किलोमीटर अंतरावर असणाऱ्या कळमजे पुलाजवळ मुंबई-गोवा महामार्गावर मुंबई-मालवण शिवशाही बस व अशोक लेलँड ट्रकची समोरासमोर जोरदार धडक लागून भीषण अपघात झाला. बुधवारी (दि. २६) सकाळी सव्वसातच्या सुमारास झालेल्या या अपघातात एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले आहेत. जखमींवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, शिवशाही बसचा दर्शनी भागापासून मागील काही भाग कापून गेला आहे. या अपघातात शाम सुंदर गावडे, वय ८५, रा. विक्रोळी, कन्या मोहरनगर, मुंबई यांचा मृत्यू झाला असून, दहा जण जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे तसेच वाहतूक पोलीस हे आपल्या सहकाऱ्यांसमवेत अपघातस्थळी तातडीने दाखल झाले. त्यांनी जखमींना औषोधोपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल केले. पान २ वर

## उरणमध्ये उर्दू पत्रकाचा स्फोट!

**| उरण | प्रतिनिधी |**

- **भाजपाच्या पत्रकबाजीतून राजकारण तापले**
- **मनसे व आघाडीचा जोरदार हल्ला**

उरण नगरपालिका निवडणुकीत भाजपाने प्रथमच उर्दू भाषेत प्रचारपत्रक काढताच तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे. आतापर्यंत कधीही न झालेले हे उर्दू प्रचारपत्रक अचानक प्रभाग क्रमांक ४ मध्ये वाटण्यात आल्यानंतर विरोधकांनी भाजपावर मुस्लीम मतांसाठी जोगवा मागण्याचा आरोप केला आहे. यामुळे निवडणूक वातावरण तापले असून, सामान्य मतदारांमध्येही चर्चेची जोरदार भडिमार सुरू आहे. उरण शहरात २ डिसेंबर रोजी निवडणूक पार पडणार आहे. प्रचार मोहीम जोमात असताना भाजपाकडून प्रभाग ४ मध्ये जिथे कोणताही मुस्लिम उमेदवार उभा नाही, तिथे उर्दू भाषेतील पत्रक वाटण्यात आले.

यापूर्वी लोकसभा, विधानसभा, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये कधीही कोणत्याही पक्षाने उर्दू भाषेत प्रचारपत्र वाटले नव्हते. त्यामुळे भाजपाचा हा अचानक घेतलेला उर्दू पान २ वर

## रसायनीत सुप्रिया केमिकल्सला आग

### रंग बनवणारा कारखाना जळून खाक

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कराडे (बुद्रुक) गावाजवळ रंग तयार करणाऱ्या सुप्रिया केमिकल्स कारखान्याला बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी पाणी आणि फोमचा मारा करत सुमारे तीन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. परंतु, कारखाना जळून पूर्णपणे खाक झाला. सुदैवाने यावेळी कारखान्यातील दोन कामगारांनी समयसूचकता दाखवत पळ काढल्याने जीवितहानी टळली आहे.



पाताळगंगा अतिरिक्त औद्योगिक वसाहतीत कराडे बुद्रुक गावापासून पाचशे मीटरपेक्षा कमी अंतरावर सुप्रिया केमिकल्स कारखाना आहे. आगीची घटना समजतात रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी तातडीने पाताळगंगा अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी खोपोली नगरपरिषद, रिलायन्स यांच्याशी संपर्क साधून तातडीने अग्निशमन बंब उपलब्ध करून दिले.

> कराडे बुद्रुक गावापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या रासायनिक कारखान्यात नेहमीच दुर्घटना घडत असतात. वर्षभरात आगीच्या दोन घटना, स्फोटाची एक घटना घडली होती. तसेच वायुगळतीचे प्रकार नेहमी घडत असल्याचे येथील ग्रामस्थ सांगतात. दोन हजारांच्या आसपास लोकवस्ती आहे. या घटनेमुळे नागरिक भीतीच्या छायेखाली असून, अशा कारखान्यावर कारवाईसाठी आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## रेवदंडा पोलिसांचा अजब कारभार

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

- **चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यास दिरंगाई**

अलिबाग तालुक्यातील आक्षीनंतर आता रेवदंडा येथील मोठा कोळीवाडा येथे मंदिरातील चांदीच्या देवाच्या मूर्ती लंपास करण्यात आल्या आहेत. याबाबत पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे. ही घटना घडून आठ दिवस झाले आहेत. मात्र, अजूनपर्यंत रेवदंडा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला नसल्याची चर्चा आहे. रेवदंडा पोलिसांचा अजब कारभार यातून उघड होत आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्याशी विचारणा केली असता, त्यांना काहीच माहिती नसल्याचे सांगितले. पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी या घटनेपासून अनभिज्ञ असल्याने रेवदंडा पोलिसांच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **रेवदंडा येथील कोळीवाड्यामधील मंदिरातील मूर्ती चोरीच्या घटनेबाबत काहीच माहिती नाही. तरीदेखील खात्री करून सांगतो.**
> **– श्रीकांत किरवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा**

मिळालेल्या माहितीनुसार, रेवदंडा पोलीस पान २ वर

### केस पेपरला लागणाऱ्या टोकनसाठी रांगेत उभे राहण्याची वेळ | नागरिकांकडून नाराजी व्यक्त

## आभा हेल्थ मिशन ठरतेय डोकेदुखी

**प्रमोद जाधव**

**| रायगड |**

आयुष्यमान भारत डिजिटल हेल्थ मिशन अभियानांतर्गत मोबाईलच्या एका क्लीकवर घरबसल्या केस पेपरची नोंदणी करण्याची सुविधा करण्यात आली आहे. मात्र, हीच ऑनलाईन सुविधा सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. टोकन नंबर मिळविण्यासाठी, तसेच केस पेपर काढण्यासाठीदेखील रांगेत उभे राहावे लागत आहे. प्ले स्टोरमधून आभा ॲप डाऊनलोड करणे, मोबाईल नंबरने रजिस्टर करणे, क्यूआर स्कॅन करणे, टोकन मिळणे, त्यानंतर टोकन नंबर दाखवून रांगेत उभे राहून केस पेपर काढणे, ही लांबलचक प्रक्रिया रुग्णांसाठी त्रासदायक ठरत आहे.



आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट, जे एक डिजिटल हेल्थ आयडी कार्ड आहे. हे कार्ड नागरिकांना त्यांचे वैद्यकीय रेकॉर्ड्स, प्रिस्क्रिप्शन आणि चाचणी अहवाल ऑनलाइन सुरक्षितपणे साठवण्यास आणि आरोग्य सेवा पुरवणाऱ्यांशी शेअर करण्यास मदत करते. ज्यामुळे आरोग्य सेवा मिळवणे सोपे आणि कार्यक्षम होते. या कार्डाद्वारे लोकांना वेगवेगळ्या आरोग्य सेवा प्रदात्यांमध्ये त्यांच्या आरोग्य माहितीवर सहजपणे प्रवेश मिळवता येतो.

> **केस पेपर काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याची समस्या मार्गी लावण्यासाठी आभा हेल्थ मिशन अंतर्गत ऑनलाईन प्रक्रीया राबविण्यात आली आहे. घरूनच ऑनलाईनद्वारे टोकन नंबर प्राप्त केल्यावर रुग्णालयात केस पेपर काढता येणार आहे. ज्यांना माहिती नाही, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कर्मचारी नेमले आहेत. मात्र, टोकन मिळण्यासाठी विलंब होत असल्यास ही प्रक्रीया अधिक सुलभ करण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्याबाबत कार्यवाही केली जाईल.**
> **– डॉ. निशीकांत पाटील,** जिल्हा शल्यचिकित्सक

जिल्हा रुग्णालयासह आठ ग्रामीण रुग्णालय व सहा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तातडीने सेवा मिळावी, केस पेपर वेळेवर मिळावे, यासाठी प्रत्येक रुग्णालयातील बाह्य रुग्ण कक्षामध्ये पुरुष, महिला ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अशा वेगवेगळ्या स्वरुपाच्या खिडक्या तयार करण्यात आल्या आहेत. या खिडक्यांमार्फत रुग्णांना सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. केस पेपरसाठी येणाऱ्या रुग्णांचे नाव, पत्ता, वय, आजार अशी वेगवेगळी माहिती घेऊन संगणकामध्ये नोंद केली जाते. त्यानंतर त्यांना केस पान २ वर

## जिल्ह्यात संविधान दिन साजरा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे संविधान सुपूर्द केले. त्यामुळे हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या शासकिय कार्यालयासह शाळा, महाविद्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचनदेखील करण्यात आले.



अलिबागमधील रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यालयात संविधान दिन बुधवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत आदरांजली वाहिली. यांनतर उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन केले. तसेच अलिबागमधील चेंढरे येथील समाजकल्याण विभाग सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामाजिक संस्थेमार्फत त्रिसरण व पंचशील घेण्यात आले. पान २ वर

# रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**



महापालिकेच्या चारही प्रभागतील रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग आला असून, रस्ते दुरूस्तीच्या कामांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानुसार, चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामांवर बांधकाम विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी कनिष्ठ अभियंता रात्रंदिवस रस्ते दुरूस्तीची कामे करत आहेत.

सध्या महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. खारघर येथील सेक्टर ३५डी मधील रस्ता दुरूस्ती काम सुरू आहे. याचबरोबर कामोठ्यामधील सेक्टर १० मधील रस्ते दुरूस्तीचे काम वेगाने सुरू आहे. नवीन पनवेलमध्ये सेक्टर ४, सेक्टा १९, सेक्टर १मध्ये रस्ते दुरूस्ती जोमाने सुरू आहे. याचबरोबर कळंबोली मधील बालाजी स्कूल जवळील रस्त्याची कामे व सेक्टर १७ मधील रस्ते दुरूस्तीची कामे सुरू आहेत. याचबरोबर नवीन पनवेलमधील डीमार्ट रस्त्याचे काम पूर्ण होत आले आहे.

# पोलादपूर नगरपंचायतीला तिसऱ्या नगराध्यक्षा

## ■ स्नेहा मेहतांनी स्वीकारला कार्यभार

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

नगरपंचायत पोलादपूरच्या नगराध्यक्ष पदाचे राजीनामे आणि नव्याने कार्यभार स्वीकारण्याच्या संगीत खुर्चीचा खेळ सुरू असून, दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर महिला आरक्षण नगराध्यक्ष पदासाठी तिसऱ्या नगरसेविका स्नेहा सचिन मेहता यांना शिवसेना पक्ष संघटनेच्या वतीने संधी देण्यात आली आहे. यानंतरही हा सत्तेच्या संगीत खुर्चीचा खेळ पुढील तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत थेट महिला नामाप्र नगराध्यक्षपदासाठी देखील निवडणुकीचा समावेश असल्याने दुसरा पंचवार्षिक कालावधी संपल्यानंतर थांबण्याची लक्षणे दिसत आहेत.

शिवसेना पक्ष संघटनेच्या निर्णयानुसार शिल्पा देवेंद्र दरेकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त नगराध्यक्षपदासाठी स्नेहा सचिन मेहता यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलादपूर नगरपंचायत मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे निवडणूक कार्यक्रमानुसार दाखल करण्यात आले. या नामनिर्देशन पत्राची छाननी पिठासन अधिकारी महाड उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे यांच्याकडून करण्यात आली. यानंतर नगराध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्याची औपचारिकता २५ नोव्हेंबरला होणार हे निवडणूक कार्यक्रमानुसार निश्चित झाले.

मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा बारा वाजता पोलादपूर नगरपंचायत शिवसेना पक्षाचे गटनेते मनोज प्रजापती, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, नगरसेवक नागेश पवार, सिद्धेश शेठ, विनायक दीक्षित, निखिल कापडेकर, सोनाली गायकवाड, शिल्पा दरेकर, अस्मिता पवार, स्वीकृत नगरसेविका मृगया शहा आदी नगरसेवक नगरसेविका यांच्या उपस्थितीत स्नेहा मेहता यांनी नगराध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला.

# विद्युत खांबालाच महायुतीचा फलक

## महावितरणकडून कारवाई केली जाणार का?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**




महावितरणच्या खांबाला फलक व अन्य काही लावणे धोकादायक आहे, असे महावितरण अधिकाऱ्यांकडून बोलले जाते. तरीदेखील अलिबागमधील महायुतीच्या उमेदवारांचे फलक अलिबाग शहरातील विद्युत खांबालाच लावण्यात आले आहे. महावितरण विभागाची कोणतीही परवानी न घेता लावण्यात आलेल्या फलकाबाबत संबंधितांविरोधात कारवाई होणार का, असा सवाल अलिबागकरांकडून उपस्थित केला जात आहे.

अलिबाग नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. प्रचारासह वेगवेगळ्या उमेदवारांकडून स्वतःची जाहिरातबाजी केली जात आहे. फलक लावून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अलिबाग शहरामध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या जाहिरातीचा फलक लावण्यात आला आहे. हा फलक महावितरण कंपनीच्या विद्युत खांबालाच लावण्यात आला आहे. विद्युत खांबाला फलक लावल्याने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना पोलावर चढण्यास अडथळे निर्माण होत आहेत. फलक लावताना महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही परवानगी घेतली नसल्याची माहिती समोर आली आहे. विद्युत खांबावर फलक लावणे धोकादायक असल्याचे बोलले जात आहे. तरीदेखील महायुतीच्या उमेदवारांकडून नियमांचे उल्लंघन करीत विद्युत खांबाला फलक लावण्याचे काम केले आहे. त्यामुळे याबाबत शहरामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला उधाण आले आहे.

> विद्युत खांबाला फलक लावणे चुकीचे आहे. तो पोल खराब झालेला असल्यास फलक लावणारा पडण्याची भीती आहे. अत्यावश्यक कालावधीत बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना पोलावर चढण्यास अडथळे निर्माण होत आहे. पोलावर फलक लावणे धोकादायक आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आलेली नाही.
>
> **– महावितरण विभागाचे अधिकारी, नाव न सांगण्याच्या अटीवरून**

## पान १ वरून

### बेलपाड्यात बिबट्याचा वावर

त्यातच जेएनपीए बंदरालगत असलेल्या बेलपाडा परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याची माहिती नागरिकांकडून समोर येत आहे. तरी, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याची खातरजमा करुन बिबट्याचा बंदोबस्त ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**उरण तालुक्यात बिबट्या आढळून आलेला नाही. मात्र, बेलपाडा गाव परिसरात बिबट्या आढळून आलेला असल्याचे समज आहे. खरं की खोटं त्याचा तपास सुरू आहे.तरी, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. जर बिबट्या आढळून आला, तर त्याची माहिती वन विभागाला देण्यात यावी.**

**– एन.जी. कोकरे, वन परिक्षेत्र अधिकारी, उरण–पनवेल**

### आभा हेल्थ मिशन ठरतेय डोकेदुखी

पेपर दिले जाते. केस पेपर मिळविण्यासाठी तासन्तास उभे राहण्याची वेळ रुग्णांवर येते. रांगेत उभे राहून केस पेपर काढूनदेखील डॉक्टर जागेवर भेटण्याबाबत कायमच ओरड राहिली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी आरोग्य विभागाने ऑनलाईनचा आधार घेतला आहे. आयुष्यमान भारत डिजीटल मिशन अभियानांतर्गत उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

आयुष्यमान भारत डिजिटल हेल्थ मिशन अभियानांतर्गत मोबाईलच्या एका क्लीकवर घरबसल्या केस पेपरची नोंदणी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी प्ले स्टोरमधून आभा ॲप डाऊनलोड करणे, मोबाईल नंबरने रजिस्टर करणे, क्यू आर स्कॅन करणे, टोकन नंबर मिळविणे, त्यानंतर टोकन नंबर दाखवून केस पेपर रुग्णालयातून घेणे ही प्रक्रिया आहे. मात्र, ही प्रक्रिया सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी बनली आहे. केस पेपर काढण्यासाठी टोकन नंबर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मोबाईलद्वारे क्यू आर कोड स्कॅन करणे गरजचे आहे. यासाठी रुग्णालयातील आभा कक्षामध्ये रांगेत उभे राहण्याची वेळ सर्वसामान्यांवर येत आहे. रांगेत उभे राहण्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळावी, यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. मात्र, टोकन नंबर मिळविण्यासाठीच रांगेत उभे राहावे लागत आहे. या लांबलचक प्रक्रियेमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.

### उरणमध्ये उर्दू पत्रकाचा स्फोट!

वळण चर्चेचा मुख्य विषय ठरला आहे. विशेष म्हणजे, ज्या प्रभागांमध्ये मुस्लिम उमेदवार व समाज मोठ्या प्रमाणात आहे, तेथे मात्र असे उर्दू पत्रक वाटले गेले नाही. त्यामुळे मतदारांमध्ये प्रश्न उठत आहेत. उर्दू पत्रक प्रभाग ४ मध्येच का? उद्देश नेमका काय? आणि कोणासाठी हा विशेष प्रयत्न? यामुळे स्थानिक मराठी मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत असून, उरणच्या राजकारणात भाषेचं नवं राजकारण सुरू झालं का? अशी विचारणा होत आहे. उर्दू पत्रकानंतर भाजपाने मुस्लिम समाजासाठी बोरी परिसरात जेवणावळही आयोजित केली. त्यानंतर महाविकास आघाडीनंही समांतर जेवणावळ ठेवत राजकीय तापमान आणखीनच वाढवलं. मुस्लिम

मतदारांना गोंजारण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांची स्पर्धा रंगली असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या संपूर्ण प्रकरणावर मनसे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी थेट भाजपावर निशाणा साधला. त्यांनी आमदार महेश बालदी यांना मुद्देसूद प्रश्न विचारत सांगितले हो, आम्हाला मुस्लिम मतं हवीत पण मराठीत! उरणचा मुस्लिम समाज मराठीच समजतो. उर्दू पत्रकाची इथे कधीच गरजच नव्हती. तसेच त्यांनी आणखी पुढे विचारले पत्रक खास बोरीतच का वाटले? उरणच्या बाकी मुस्लिम वस्त्या का गाळल्या? या निवडक पत्रकबाजीत नेमका कोणाचा स्वार्थ लपलाय? मनसेच्या टीकेसोबत महाविकास आघाडीनेही भाजपाला घेरलं.

माजी आमदार व जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, भाजप गेल्या १५–२० वर्षांपासून नगरपालिकेत सत्तेत आहे. आता सत्ता गळतीच्या भीतीने मुस्लिम समाजाला खुश करण्याचे प्रयोग सुरू आहेत. पण उरणकर हुशार आहेत; ते या उर्दू खेळाला बळी पडणार नाहीत. दरम्यान, भाजप आमदार महेश बालदी यांनी सर्व आरोप फेटाळून लावत प्रतिप्रश्न केला. उर्दू पत्रक काढलं तर काय बिघडलं? उर्दू ही देशातील मान्य भाषा आहे. प्रचाराला भाषा अडसर असते का? त्यांचे उत्तर आल्यावरही विरोधकांचा हल्ला शमवण्याची चिन्हे दिसत नाहीत.

उरण नगरपालिका निवडणुकीला अगदी काहीच दिवस उरले असताना उर्दू पत्रकबाजीमुळे निर्माण झालेल्या या वादळाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ३ डिसेंबरचा निकालच दाखवेल उर्दू पत्रकाचा फायदा कोणाला आणि फटका कोणाला!

### नेरळ रस्त्यावर धामोते परिसरात गोळीबार

ओव्हरटेक करून त्यांच्या गाडीच्या पुढे आपली दुचाकी आडवी घातली.त्यावेळी काय रे तुला माज आला आहे काय असे विचारत स्वतःजवळील रिव्हॉल्व्हरमधून गोळीबार केला. त्यातील एक गोळी सचिन भवर यांच्या कमरेच्या बाजूने गेली, तर दुसरी गोळी उजव्या बाजूला पोटाच्या जखम करून गेली.

रात्री सव्वा नऊ वाजता ही घटना घडली असून, नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन जखमी भवर यांना रुग्णालयात दाखल करण्यास नेले. तर, सकाळी फॉरेन्सिक टीम पाचारण करण्यात आली असून, पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. या गुन्ह्याची नोंद नेरळ पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून, अविनाश जगन्नाथ मार्के आणि एका अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

### शिवाशही–ट्रकला भीषण अपघात

या अपघाताबाबत अधिक माहिती अशी की, मुंबईहून मालवणकडे निघालेली शिवशाही बस क्र.एम.एच.०९–इएम–९०७४ व माणगाव बाजूकडून येणारा अशोक लेलँड क्र.एम.एच.४३–सीके.३४२१ या ट्रकची माणगावजवळील कळमजे पुलाजवळ समोरासमोर धडक लागून भीषण अपघात घडला. या अपघातात शाम सुंदर गावडे यांचा माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर, अंकुश चंद्रकांत मेस्त्री वय ५४, रा.आचरा मालवण, शशिकांत शंकर तावडे वय ७२, रा.पन्हाळे, जि.रत्नागिरी, प्रशांत शशिकांत राजशिर्के वय ४०, रा. शिंदेवाडी–कोडमला, जि. रत्नागिरी, सुप्रिया सुधाकर मोरे वय ५५, रा. विक्रोळी मुंबई, प्रतिभा प्रकाश नागवेकर वय ५९, रा. संगमनेर, जि. रत्नागिरी, आर्या अमित मयेकर वय ३८, रा.संगमेश्वर जि. रत्नागिरी, गायत्री अमित मयेकर वय १३, रा. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, अक्षता अनंत पोळवणकर वय ४०, दीपाली तुकाराम मोकल वय ३०, रा. आमटेम जि. रायगड, आयशा अमित मयेकर वय ६, संगमेश्वर, जि. रत्नागिरी हे दहाजण किरकोळ जखमी झाले.

हा अपघात अत्यंत भीषण होता. दरम्यान, ट्रकमध्ये सीएनजी गॅस असल्याने त्याचा स्फोट होतो की काय, याची भीती अपघात ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्वांना वाटत होती. या अपघातामुळे मुंबई–गोवा महामार्गावर काही काळ वाहतूक व्यवस्था खोळंबली होती. ती वाहतूक व्यवस्था सुरळीतपणे सुरु राहण्यासाठी वाहतूक पोलिसांनी प्रयत्न केले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस करीत आहेत.

### रेवदंडा पोलिसांचा अजब कारभार

ठाण्याच्या हद्दीतील रेवदंडा येथील मोठा कोळीवाडा येथील एका मंदिरात घुसून चोरट्यांनी चांदीचे चार देव, देवीचा चांदीचा मुखवटा लंपास केल्याची माहिती तेथील स्थानिकांकडून उपलब्ध झाली. ही घटना गुरुवारी घडली आहे. याबाबत तक्रार करण्यात आली आहे. मात्र, अजूनपर्यंत गुन्ह्याची नोंद झाली नसल्याची माहिती समोर येत आहे. घटना घडून अनेक दिवस उलटूनही रेवदंडा पोलिसांकडून गुन्हा दाखल केला जात नाही. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका आठवड्यात दोन चोरी, घरफोडीच्या घटना घडूनही त्याची नोंद होत नाही, त्यामुळे पोलिसांच्या कारभाराबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात कडक पावले उचलली आहेत. कामामध्ये गैरप्रकार करणाऱ्या पोलिसांविरोधात कारवाई करण्यात येत असताना, अवैध धंदे चालकांना मदत करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे रेवदंडा पोलिसांच्या या प्रतापाबाबत पोलीस अधीक्षक योग्य ती दखल घेऊन कारवाई करतील, असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

या घटनेबाबत रेवदंड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्याशी संपर्क साधून त्यांना विचारणा केली. त्यावेळी त्यांनी चोरी, घरफोडीच्या घटनांबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगितले. त्यामुळे रेवदंड्यातील प्रभारी अधिकारी या गंभीर घटनांबाबत अनभिज्ञ असल्याने वेगवेगळ्या चर्चेला ऊत येत आहे

### जिल्ह्यात संविधान दिन साजरा

यावेळी महामानवाला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधानातील प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयासह शाळा महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला असून सामाजिक, शैक्षणिक आदी विविध संस्थामार्फतदेखील हा दिन साजरा करण्यात आला. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाबद्दल माहिती देण्यात आली. संविधानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

# ‘वाहतूक कोंडीवर तातडीने कार्यवाही करा’

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे सेक्टर ३४ व ३५ परिसरात मालवण तडका आणि नीलकंठ हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ दररोज गंभीर स्वरूपाची वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्याची रुंदी कमी असतानाही दोन्ही बाजूंना अनियमितपणे वाहनांची पार्किंग होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याबाबत शिवसेना उपशहर प्रमुख कामोठे सचिन त्रिमुखे यांनी वाढत्या वाहतूक कोंडी व अनियमित पार्किंगबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत पनवेल महापालिइकचे आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे पाणवळ्याच्या समोर रस्त्यावर चारचाकी आणि दुचाकी वाहने अनधिकृतपणे उभी केल्यामुळे मार्ग अत्यंत अरुंद होऊन वाहतूक ठप्प होते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३८३ जुना गट नं. ५२३ (जुना सर्वे नं. २०९/१) ही मिळकत, त्या मिळकतीच्या ७/१२ उतारी मालक कब्जेदार म्हणून दाखल असलेल्या श्री. संदीप श्रीकृष्ण साळवी वगैरे यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली असून, आमचे अशिलांनी निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची देखील मागणी केली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकतीं या निर्वेध आहेत असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीखः -२७.११.२०२५.

सही/-
**(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड.



**पनवेल महानगरपालिका**
**सार्वत्रिक निवडणूक - २०२५**
**प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीची सुधारीत सूचना**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४१/का-५ दि. २६ नोव्हेंबर, २०२५ ने प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागवीणेकरीता सुधारीत वेळापत्रक प्राप्त झाले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | दि.१३/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि.२७/११/२०२५ | दि.०३/१२/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणीत करुन प्रसिद्ध करणे. | दि.५/१२/२०२५ | दि.१०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | दि.०८/१२/२०२५ | दि.१५/१२/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | दि.१२/१२/२०२५ | दि.२२/१२/२०२५ |

**स्वाक्षरी-**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की माझे आशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विकत घेण्याचे ठरविले व तशी बोलणी केलेली आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे. डोंगरवाडी ता. रोहा जि. रायगड येथिल जमीन मिळकत**

| गट नं./ भुमापन नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रू. पैसे | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३४/३ | १.०१.१० पोटखराबा ०.२५.०० एकुण १.२६.१० | ०.७२ | अंजना लऊ सावंत वगैरे १ |

सदरहु वर नमुद केलेली नवीन अविभाज्य सत्ता प्रकार मिळकत मिळकतीचे भोगवटाधारक यांचे मालकीची व ताबे कब्जाची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरून तसे दिसते सदर मिळकत यांचेकडुन आमचे आशिलाने तदंगभुत सर्व हक्कांसह कायम फरोक्त घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क कोणाचा काही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज लिन वगैरे प्रकारचा हक्क वा कुळहक्क अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलाचे लांभात सोडून दिला आहे असे समजून माझे अशिल संदर्भित मिळकतीचे फरोक्तखत, रजिस्टर्ड करतील व मागावुन येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे

रोहा
दि. २६/११/२०२५

सही/-
**ॲड. भाग्यश्री सी. गावडे**
०२,सत्या अपार्टमेंट,दमखाडी ता. रोहा जि. रायगड
मोबा.७८८७६४०३०४



**जाहीर सूचना**

आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात श्री. मकरंद सुरेश नार्वेकर यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत, ज्यांचा असा दावा आहे की ते खालील निर्देशित प्रथम अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात मालक आहेत.

मालकांनी असे सादरीकरण दिले आहे की, खालील निर्देशित द्वितीय अनुसूचीमध्ये विवरणीत केल्यानुसार सदर मालमत्तेसंदर्भातील मूळ हक्क करार ते त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत/गहाळ झाले आहेत वा चोरीस गेले आहेत. मालकांनी यांदर्भात

गहाळ अहवाल क्र. १५६४३२–२०२५ व १५६४११–२०२५ दोन्हीही दिनांकित २५.११.२०२५ अंतर्गत कुलाबा पोलीस स्टेशन येथे गहाळ मालमत्ता तक्रार दाखल केली आहे.

कोणाही व्यक्तीच्या वा व्यक्तींच्या ताब्यात वरील निर्देशित हरवलेले व गहाळ दस्तावेज असल्यास तसेच सदर मालमत्तेसंदर्भात वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, गहाण, हस्तांतरण, भाडेकरार, विनिमय, भेट, निधन, अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही वैध हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात आम्हाला लिखित स्वरूपात मूळ सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशा हरकती/दावे/हितसंबंध/तपशील, काही असल्यास, त्याचे वर्णन करून सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत पीएसजे लीगल, वकील व सॉलिसिटर्स यांना पत्ता ८०८, सनशाइन टॉवर्स, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०१३ येथे सूचित करावे.

अन्यथा मालक हे सदर खालील निर्देशित प्रथम अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेतील हक्क, अधिकार व हितसंबंधांचे पात्र आहेत असे समजण्यात येईल तसेच सदर मालमत्तेतील मालकांचे हक्क, अधिकार व हितसंबंध हे सर्व भारांपासून मुक्त समजण्यात येतील तसेच वरील दस्तावेज गहाळ आहेत असे समजण्यात येईल आणि असे दावे, काही असल्यास त्यांच्याकोणत्याही संदर्भाविना मालमत्तेसंदर्भात हक्क चौकशी व व्यवहार पूर्ण करण्यात येईल व ते अधित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित प्रथम अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**

पुढील विवरणीत बिगर शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूकंड, गाव मापगाव, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व खालील विवरणीत गट क्रमांक व क्षेत्र (एच आर पी) यानुसार.

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर.पी./तत्सम |
|---|---|---|
| १. | २५३ | ३९–८०–०० |
| २. | २५४ | २५–५०–०० |
| ३. | २५६ | २४–५०–०० |
| ४. | २५८ | ११–१०–०० |
| ५. | २५९ | ६३–१०–०० |
| | एकूण | १६४–००–०० अर्थात १६–४०–००० चौ मी. अंदाजे |

**वरील संदर्भित द्वितीय अनुसूची**
**(हरवलेले/गहाळ हक्क दस्तावेजांचे विवरण)**

१. गट क्र. २५४ संदर्भात शैला नंदलाल परळकर आणि आशिष हसमुखभाई वीज व मुकेश भागवतप्रकाश अग्रवाल यांच्या दरम्यान केलेला अभिहस्तांकन करार दि. ०२.०६.२०११, दस्तावेज क्र. २५४२/२०११

२. गट क्र. २५९ संदर्भात जयवंत शंकर राऊत व अन्य आणि मुकेश भागवतप्रकाश अग्रवाल यांच्या दरम्यान केलेला अभिहस्तांकन करार दि. ०२.०६.२०११, दस्तावेज क्र. २५५८/२०११

३. गट क्र. २५९ संदर्भात अशोक पंढरीनाथ राऊत व अन्य आणि महेश पंढरीनाथ राऊत व अन्य यांच्या दरम्यान केलेला विमोचन करार दि. १४.०६.२०१३

४. गट क्र. २५६ व २६९ संदर्भात सुनंदा दत्तात्रय नागोठणेकर व अन्य आणि जनाबाई भिकू माने यांच्या दरम्यान केलेला विमोचन करार दि. ०९.०१.२०१५, दस्तावेज क्र. १२६/२०१५.

दिनांक : २७ नोव्हेंबर, २०२५

**पत्ता : पीएसजे लीगल, वकील व सॉलिसिटर्स, ८०८, सनशाइन टॉवर, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०१३**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येत आहे की, मौजे जांभोशी, ता. पेण, जि. रायगड येथील श्री. परेश चाहु भोईर व श्री. निलेश चाहु भोईर दोघेही रा. चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकी हक्काची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभोशी, तालुका- पेण, जिल्हा-रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.-पैसे |
|---|---|---|---|
| ४० | | ००-४४-६० | ०.६० |
| ३९ | | ००-६१-७० | ८.३६ |
| ३५ | | ००-५४-२० | ३.०३ |

सदरहू जागा, जमीनी व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कूळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटिशीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहित धरुन आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण:
दिनांक: /११/२०२५ सही/-

Adv. Dhanraj K. Keni
Advocate
Mob. No:- 9702439787
Office Add. : Pushakar Soc. Flat No. 02, near SDO office, thana naka, Tal. Panvel, Dist. Raigad, Pin No. 410 206



**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सिताबाई बळीराम कडवे, २) मिना दिनानाथ मोहिते, ३) रवींद्र बळीराम कडवे, ४) नाथा बळीराम कडवे, ५) रेश्मा महेश म्हात्रे, ६) रचना रमेश थळे, ७) वनिता यशवंत मढवी, ८) सुजय शांताराम तेलगे, ९) सुहास शांताराम तेलगे आणि १०) भक्ती रुपेश भगत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - विर्तसारळ, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५/२, एकूण क्षेत्र ००-९७-५० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. २०.८१/- पैकी क्षेत्र ००-६७-४० (हे.आर.चौ.मी.) खाते क्र.१७ आणि १९ साठी सदर जाहीर सूचना देण्यात येत आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २७/११/२०२५

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## निवडक



### चिल्हे येथे संविधान दिन

**खांब** : रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम मुख्याध्यापक दिपक जगताप यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच संविधानाच्या उद्देशिकांचेही वाचन करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आस्था विनोद थिटे व आराज्ञा ज्ञानेश्वर भोईर यांनी संविधान म्हणजे काय?, संविधानाची उद्दिष्ट्ये, संविधानाचे महत्व आदींबाबत माहिती सांगितली.यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



### नांदगाव विद्यालयात संविधान दिन

**पाली/गोमाशी** : सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे बुधवार (दि.२६) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्वांनी मिळून संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधान दिनानिमित्त आर्या मगर,अथर्व भोईर, अनुष्का शिंदे, मिहीर सायगावकर या विद्यार्थ्यांनी तर तन्मयी शिंदे, भूषण सुतार या शिक्षक वृंदानी संविधानाची म हत्वाची कलमे, नागरिकांचे मुलभूत हक्क व कर्तव्य यांची सखोल माहिती दिली. तसेच मुळात संविधानाची गरज का आहे या बाबत सविस्तर विवेचन करत संविधान विषयी सखोल माहिती देवून जनजागृती केली. या कार्यक्रमास प्राचार्य बबन पालवे, ज्येष्ठ शिक्षक अशोक शिंदे, महेंद्र निकुंभ, नागेश सायगावकर, आकाश ठाकुर, स्वाती शिंदे, तन्मयी शिंदे, सोनल ठकोरे, जयश्री अहिरराव, शामल कंबलकर, विद्या भिसे आदी शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश सायगावकर तर आभार महेंद्र निकुंभ यांनी केले.



### अमृत महोत्सवी संविधान दिन साजरा

**माणगाव** : नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद विकास कॉलनी या शाळेत अमृत महोत्सवी संविधान दिन बुधवारी (दि.२६) मान्यवरांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संविधान प्रतिज्ञा (उद्देशिका) घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांची शाळेपासून माणगाव पंचायत समिती कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. पंचायत समिती जवळ विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित उत्कृष्ठ असे पथनाट्य सादर केले. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभदा पाटील, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, उर्मिला मोरे, पंचायत समितीचे कर्मचारीवृंद, विकास कॉलनी शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे, निलम गायकवाड, पालकवर्ग, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### तटकरे महाविद्यालयात संविधान दिन

**माणगाव** : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग आयोजित भारतीय संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे पूजन व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी कु. राज ओव्हाळ याने भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेतून प्रा. डॉ. जे. आर. पाण्डेय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग समन्वयक यांनी भारतीय संविधानाचे स्वरूप, विचार, कार्य, संविधान निष्ठा यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच मराठी विभाग प्रमुख व उप प्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांनी समता, बंधुता, एकतेची भावना, भारतीय संविधानाची इतिहास निर्मिती प्रक्रिया तसेच महत्वाच्या कलमांविषयी उद्देशपूर्ण मार्गदर्शन केले, तसेच भूगोल विभाग प्रमुख डॉ. सिंगारे यांनी देखील विद्यार्थाना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते व मार्गदर्शक म्हणून लाभलेले प्रा. डॉ. एन. एल. राठोड आणि डॉ. प्रभाकर गावंड सुंदराव मोरे महाविद्यालय पोलादपूर रायगड यांनी भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये, महत्व, आणि समकालीन सुसंगता यावर मार्गदर्शन केले, तसेच डॉ. प्रभाकर गावंड यांनी संविधानावर आधारित एक अत्यंत सुबक व अर्थपूर्ण कविता सादर केली. ज्यामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

# विद्यार्थ्यांसाठी एसटीची हेल्पलाईन

- एसटी महामंडळाने घेतला निर्णय
- तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाणार

### विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीची जबाबदारी आगार व्यवस्थापकावर

एसटी बसेस उशिरा सुटणे, अचानक रद्द होणे अथवा अन्य कारणामुळे शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींचे तास चुकतात किंवा परीक्षेला ते वेळेवर पोहोचू शकत नाहीत, काही वेळेला त्यांची महत्त्वाची परीक्षा देखील बुडते . विद्यार्थ्यांच्या अशा शालेय नुकसानीला संबंधित क्षेत्रातील आगार व्यवस्थापक व त्यांचे पर्यवेक्षक यांना जबाबदार धरण्यात येईल! या पुढे सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी ५-६ या वेळेत मुख्य बसस्थानक व ज्या ठिकाणी विद्यार्थी चढ-उतार जास्त होतो अशा थांब्यावर संबंधित आगाराच्या पर्यवेक्षकांनी गणवेशात थांबून वाहतुकीचे नियोजन करावे. शाळेचा शेवटचा मुलगा अथवा मुलगी बस मधून सुखरूप घरी जाईपर्यंत संबंधित पर्यवेक्षकांनी तेथून हलू नये! अशा सक्त सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत. तसेच शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची लेखी तक्रार संबंधित विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींनी तसेच संबंधित शाळा- महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी केल्यास जितक्या दिवसाचे शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणारे पर्यवेक्षक अथवा अधिकाऱ्यांना निलंबित अथवा सक्तीचे रजेवर पाठवण्यात यावे. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या महाव्यवस्थापक (वाहतूक) यांना दिले आहेत.

**एसटीचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित प्रवास असे ब्रीद घेऊन राज्य परिवहन मंडळाची लालपरी राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचते. प्रवाशांना उत्तम प्रवास सुविधा देण्याबरोबरच आता एसटी महामंडळाने शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवास देण्यासाठीच पुढाकार घेतला आहे. आता एसटीमध्ये प्रवास करताना शालेय विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण आली तर त्यांना तातडीने मदत करण्यासाठी एसटी तत्पर राहणार असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**

| रायगड | प्रतिनिधी |

शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळाने हेल्पलाईन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यभरातील लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटी महामंडळ शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी बस फेऱ्या उपलब्ध करून देत असते. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना घरातून शाळेला जा-ये करण्यासाठी मासिक पास मध्ये ६६.६६ टक्के सवलत दिली जाते. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत मासिक पास दिला जातो. तथापि, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींनी अनेक समस्या व तक्रारी आणि व्यथा मांडून मदतीचा कात मागितला होता. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन सुरू केली आहे.




अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार त्यातील काही विद्यार्थ्यांनी केल्या. तसेच संध्याकाळच्या वेळी शाळा -महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. परंतु, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे त्यांना त्यांच्या पालकाचे ओरडे खावे लागतात. अनेक ठिकाणी तर गैरसमजातून पालकांनी विद्यार्थ्यांना उशिरा येण्याबद्दल शिक्षाही दिलेल्या आहेत. याचा विपरीत परिणाम म्हणून काय विद्यार्थिनींनी आत्म हत्या केल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत.

शालेय विद्यार्थ्यांना आपल्या घरातून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाडामुळे बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्पलाइन क्रमांक वर संपर्क करून मदत घ्यावी या हेतूने १८००२२१२५१ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे. तरी या क्रमांकावर विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींनी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

तसेच ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येत आहेत. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच थेट विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी देखील या विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात.

### लहरी हवामानाचा भाजीपाल्यावर परिणाम

| रायगड | प्रतिनिधी |

हिवाळा सुरू होताच सर्वसाधारणपणे भाजीपाला बाजारात भाज्यांची आवक वाढल्याने दर कमी होत असतात. मात्र यंदा हवामानातील लहरीपणा, परतीच्या पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि बाजारात येणाऱ्या मालातील घट यामुळे भाज्यांचे किरकोळ तसेच घाऊक दर झपाट्याने वाढले आहेत. त्यातच मार्गशीर्ष महिना सुरू झाल्याने सात्त्विक पदार्थ, नैवेद्य आणि उपवासांमध्ये वापरल्या जाणाऱ्या भाज्यांची मागणी वाढल्याने दरवाढ आणखी प्रकर्षाने जाणवत आहे. बाजारात हिवाळ्याच्या सुरुवातीला साधारणतः चांगल्या प्रतीचा भाजीपाला मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो.

त्यामुळे काही भाज्यांचे दर वाढले तरी बाजारात आवश्यक प्रमाणात माल मिळत राहतो आणि किमती स्थिर राहतात. परंतु यंदा लांबलेल्या पावसाचा फटका आणि ढगाळ वातावरणामुळे अनेक पिकांवर बुरशी, सड आणि फुलगळती झाली आहे. हिवाळ्याचा मुख्य हंगाम असूनही गुणवत्तापूर्ण भाज्या अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याशिवाय, मार्गशीर्ष महिन्यात अनेक घरांमध्ये मांसाहार टाळत शकहाराचा अवलंब केला जात असल्याने नेहमीपेक्षा जास्त भाज्या खाल्ल्या जातात. परिणामी, सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराचा खर्च वाढला आहे.

### श्री सत्यसाईबाबा जन्म शताब्दी सोहळा उत्साहात

**शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती**



| रेवदंडा | प्रतिनिधी |

अध्यात्मिक गुरू श्री सत्यसाईबाबा यांच्या जन्मशताब्दी सोहळा महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात नागाव खारगल्ली येथील साईनगरमध्ये प्रशांती निवास धोबन तळे येथे साजरा करण्यात आला.

खारगल्ली साईनगर येथील प्रशांती निवास येथे श्री सत्यसाईबाबा जन्मशताब्दी सोहळा महोत्सवानिमित्त पंचक्रोशीतील गरजू नागरिकांना श्री साई नेत्रालय या ओपीडी युनिटचा उद्‌घाटन सोहळा आयोजीत करण्यात आला होता. या प्रसंगी माजी विधानपरिषद आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीसह नागाव ग्रा.प.माजी सरपंच नंदु मयेकर, नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा मयेकर, शरद वरसोलकर, सुरेश खोत, निलेश खोत, बाळू नवखारकर, कैलाश गावडे, शिवराम पटेल, संदिप नाईक, रामदास कोल्हे, अशोकराव सोनावणे, अंबादास कोल्हे, वैभव वाघ, किशोर येरमे, भास्कर कोल्हे, तसेच डॉ.अरूण गवळी, डॉ. अरविंद आठवले आदी मान्यवर मंडळीची उपस्थित होते. प्रसंगी माजी आमदार जयंत पाटील यांच्या शुभहस्ते श्री साई नेत्रालय या ओपीडी युनिटचे उद्‌घाटन करण्यात आले. श्री साई नेत्रालय या ओपीडी युनिटद्वारे मोफत नेत्र संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू, काच बिंदूचे मोफत ऑपरेशन सुध्दा मोफत करण्यात येईल, असे आयोजकांच्या वतीने जाहीर करण्यात आले. या प्रसंगी मोठ्या संख्येने श्री सत्यसाई भक्तमंडळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीस माजी आमदार जयंत पाटील यांनी श्री सत्यसाईंच्या दर्शनाचा लाभ घेतला. श्री सत्यसाई सेवक सुरेश मेहेर याच्या हस्ते मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

खारगल्ली प्रशांती निवास येथे श्री सत्यसाईबाबा जन्म शताब्दी निमित्त ओंकारम सुप्रभातम, ईश्वर किर्तन, भजन व आरतीनंतर दर्शन सोहळा, प्रसाद वितरण व चहा कॉफी, कल्चर प्रोग्राम, नेत्रालय ओपीडी युनिटचे उद्‌घाटन, अल्पोपहार व चहा, येथे फळे व बिस्किट पॅकेट वाटप आदी कार्यक्रम करण्यात करण्यात आले. नारायण सेवेनिमित्त जिल्हा सामान्य रूग्णालय अलिबाग व श्री समर्थ वृध्दाश्रम परहूरपाडा येथे अन्नदान, थेरोंडा गणपतीपाडा येथे कार्यक्रम, थेरोंडा येथे भजन व जन्म शताब्दी महोत्सव सोहळा आयोजीत करण्यात आला होता.

### सुर्वेंकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

वायशेत येथील सिताराम पाटील यांचे चुलत बंधू रविंद्र पाटील यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ व रायगड जिल्हा शिक्षक पतपेढी अलिबागचे अध्यक्ष राजेश सुर्वे यांनी वायशेत येथील त्यांच्या राहत्या घरी जाऊन पाटील कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. राजेश सुर्वे यांच्यासह पतपेढीचे संचालक नितीन पाटील व कर्मचारी यांनी पाटील यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी सुर्वे म्हणाले की, रवि पाटील यांनी शिक्षक पतपेढी अलिबागमध्ये ३० वर्षे प्रामाणिक सेवा केली. एक कार्यक्षम कर्मचारी ते होते, असे म्हणत त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

### निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे पालन करा

**पोलीस महानिरीक्षक संजय दराडे**

| माणगाव | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात दहा नगरपंचायत, नगरपालिका निवडणुका पार पडत आहेत. येत्या २ डिसेंबरला निवडणुका पार पडत असून ३ डिसेंबरला निकाल घोषित होणार आहेत. रायगड जिल्ह्यात दहा नगरपंचायत, नगरपालिका आदर्श आचारसंहिता लागू असून निवडणूक कालावधीत आदेश आचारसंहितचे योग्य पालन करावे असे, कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी आढावा दौऱ्यनिमित माणगाव येथील पत्रकारांशी संवाद साधला.

नगरपंचायत, नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी २५ नोव्हेंबर रोजी आढावा दौऱ्यानिमित्त माणगाव शासकीय विश्रामगृह माणगाव येथे पत्रकारांशी संवाद साधला.



यावेळी पोलीस महानिरीक्षक संजय दराडे म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील दहा नगरपंचायत, नगरपालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता सुरू आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत पोलीसांवर महत्वाची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने लागणारा बंदोबस्त व करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन आढावा दौरा करीत आहे. संवेदनशील ठिकाणी तसेच आचारसंहिता लागू असणाऱ्या ठिकाणी पोलिसांची करडी नजर असून निवडणूक आचारसंहिता योग्य रीतीने पार पडेल. यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिकारी उपस्थित होते.



(छायाचित्र : समीर मालोदे)

● चंपाशष्टीनिमित्त अलिबाग-वरसोली येथील प्रति जेजुरी समजल्या जाणाऱ्या श्री खंडोबा मंदिरात दर्शन घेण्यासाठी कोळी बांधवांनी गर्दी केली होती

**महिला भाविकांची गर्दी** | देवींच्या मुखवट्यांसह सजावटीच्या साहित्यांनी बाजारपेठा सजल्या

## आजपासून महालक्ष्मी व्रत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

मार्गशीर्ष महिन्यामध्ये चार गुरुवारी महालक्ष्मीचे व्रत केले जाते.त्यासाठी लागणारे पुजेचे साहित्य, देवीचे मुखवटे, चूनरी, लक्ष्मीव्रत वाचन पोथी आदी साहित्यांनी बाजारपेठा सजल्या आहेत. या वस्तु खरेदीसाठी महिलांची दुकानांमध्ये गर्दी होऊ लागली आहे. महालक्ष्मी व्रताला गुरुवारी(दि.२७)पासून सुरुवात होणार आहे. त्यासाठी खरेदीची लगबग आदल्यादिवशी बुधवारी बाजारात दिसून आली.

हिंदू संस्कृतीमध्ये मार्गशीर्ष महिन्यात घरोघरी महालक्ष्मीचे व्रत केले जाते. धनसंपत्ती, सुख-समृद्धी नांदावी यासाठी मार्गशीर्ष महिन्यातील दर गुरुवारी



महालक्ष्मीची स्थापना करून महिलांकडून उपवास केला जातो. यंदा या व्रताला गुरुवारी २७ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. देवीच्या पूजनासाठी लागणारे साहित्य, सुबक, आकर्षक आणि विविध प्रकारच्या मुखवट्यांची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळे वावेसह अलिबाग, रेवदंडा, आदी बाजारात यंदा फायबर आणि प्लास्टिकचे मुखवटे विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. या मुखवट्यांच्या किंमती १५० रुपयांपासून एक हजार रुपयांपर्यंत आहेत. यात वैष्णोदेवी, कोल्हापूरची अंबाबाई, मुंबादेवी आणि एकविरा देवीचे मुखवटे यांचा समावेश आहे. मुखवट्यांबरोबरच डोळे, नथ आणि कुंकू असलेले मुखवट्याचे स्टिकरही बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. महालक्ष्मीला सजवण्यासाठी यंदा खण, पैठणी, कोल्हापुरी, अशी विविध प्रकारची आकर्षक वस्त्रे, पोथी तसेच घडवणीचे आकर्षक दागिने उपलब्ध आहेत. आजपासून महालक्ष्मी व्रताला सुरुवात होणार आहे. त्यानिमित्ताने पुजेच्या साहित्यांसह सजावटीच्या साहित्यांची खरेदी करण्यासाठी महिलांची अलोट गर्दी बुधवारी बाजारात दिसून आली. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून आला.

> **मार्गशीर्ष महिन्यात महालक्ष्मी व्रत केले जाते. त्यानिमित्ताने लागणारे पुजेचे साहित्य, देवीचे मुखवटे आदी वस्तू खरेदी करण्यासाठी महिलांनी आदल्या दिवशी गर्दी केली. घडविण्याच्या दागिन्यांसह देवीच्या मुखवट्यांना प्रचंड मागणी आहे.**
> **- नेहा नरेंद्र पाटील- मालक श्रृंगार नॉव्हेल्टी, वावे**

# खून करा, माफी मागा, सुटा..

सर्वोच्च न्यायालयाचे अलिकडचे काही निर्णय कोड्यात टाकणारे आहेत. गुन्हेगारांना शिक्षा करण्याऐवजी प्रकरणे तडजोडीने संपवून टाकण्याचा अजब पायंडा या निर्णयांमधून पडतो आहे. उद्योगधंदे, रस्ते किंवा धरण इत्यादी प्रकल्पांसाठी आधी पर्यावरणाची मंजुरी घेणे हे कायद्याने बंधनकारक आहे. पण काही दिवसांपूर्वी न्यायालयाने दिलेल्या निकालात हे बंधन जणू काढून टाकण्यात आले. सरकारी व खासगी क्षेत्रातली विमानतळ, इस्पितळे, बिल्डरांची घरे इत्यादी असंख्य प्रकल्पांमध्ये अशी परवानगी न घेताच काम पूर्णत्वास नेल्याचा खटला न्यायालयापुढे होता. त्यात काही दंड आकारून ही बांधकामे व कामे नियमित करून टाकण्यात आली. याला एका न्यायमूर्तींनी विरोध केला. पण दोन विरुध्द एक या मताने दंड आकारून गुन्हा विसरून जाण्याचा निर्णय अंतिम झाला. आता पुन्हा असेच आणखी एक प्रकरण घडले आहे. सरकारी बँकांचे हजारो कोटी रुपये बुडवून परदेशात पळून गेलेल्या उद्योगपतींची संख्या बरीच आहे. यापैकी संदेसरा नावाच्या उद्योगपतींनी तब्बल १५ हजार कोटी रुपयांची कर्जे बुडवल्याचा आरोप आहे. त्याबाबतची चौकशी व खटले गेली आठ वर्षे चालू आहे. अखेर पाच हजार कोटी रुपये घेऊन मांडवली करा आणि सर्व खटले रद्द करा असा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींनी दिला आहे. व्यवहार म्हणून काही जणांना या निर्णयात कदाचित काही खटकणार नाही. एवीतेवी बँकांचे पैसे बुडणारच होते, त्याऐवजी किमान त्यांना पाच हजार कोटी रुपये तरी मिळतील असा दिलासा काही जण त्यात शोधतील. पण न्यायालयाचे फैसले हे तत्वाच्या, न्यायाच्या व कायद्याच्या आधारे होणे अपेक्षित असते. व्यवहाराच्या अंगाने नव्हे. अशा रीतीने व्यावहारिक तोड काढली जाऊ लागली तर कर्जे घेणाऱ्यांना हे एक प्रोत्साहनच दिल्यासारखे होईल. शंभर कोटींचे कर्ज घ्या आणि त्यातले फक्त तीस कोटी रुपये फेडा असा हा संदेश असेल. हा तत्वाच्या दृष्टीने तर घातक आहेच, पण आपल्या बँकांचे आरोग्य व अर्थव्यवस्थेचे हित यांच्याही गळ्याला नख लावणारा आहे.

### नायजेरियात बस्तान

नितीन व चेतन संदेसरा हा गुजराती धंदेवाले चहा तसेच इतर अनेक व्यापारांमध्ये कार्यरत होते. १९८० च्या दशकात त्यांनी मोठा विस्तार केला. ते इंजिनिअरिंग व औषध उद्योगात शिरले. स्टर्लिंग बायो, स्टर्लिंग फार्मा इत्यादी त्यांच्या कंपन्या होत. औषधांमध्ये वापरल्या जाणाऱ्या जिलेटिनचे जगातले सर्वात मोठे उत्पादक अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी धंदा वाढवण्यासाठी स्टेट बँकेसह इतर सरकारी बँकांकडून वेळोवेळी तब्बल १५ हजार कोटींची कर्जे घेतली. ती घेण्यासाठी त्यांनी खोटी कागदपत्रे तयार केली व या कर्जांच्या रकमा अन्यत्र फिरवल्या असा त्यांच्यावर आरोप होता. त्यातूनच त्यांच्याविरुध्द सीबीआयची चौकशी सुरू झाली. अखेरीस २०१७ मध्ये ते देश सोडून पळाले. त्यापूर्वी त्यांनी नायजेरिया सरकारशी चांगले संधान बांधले होते. तेथील तेल क्षेत्रात आपण गुंतवणूक करायला तयार आहोत अशी लालूच त्यांनी त्या सरकारला दाखवली होती. नायजेरियातील गुन्हेगारी, खंडणीखोरी, माफिया टोळ्यांचे वर्चस्व यामुळे तेथे धंदा करायला युरोपीय कंपन्या मागत नाहीत. संदेसरांनी तेथे जम बसवला. संदेसरा हे काही तेल क्षेत्रातले तज्ज्ञ नव्हेत. पण त्यांच्याकडे बँकांचा लुटलेला पैसा होता आणि आणखी पैसा कसा उभा करायचा याची माहिती होती. त्यातून त्यांनी नायजेरियामध्ये तेलाच्या खाणी व तेलशुध्दीकरण कारखाने उभारले. सरकारशी सहयोग केला. त्यातून त्यांचा धंदा चांगलाच फोफावला. आज ते नायजेरियातील बलाढ्य तेलसम्राट झाले आहेत. दिवसाला ५० हजार बॅरल्स तेलाचे उत्पादन ते करतात. नायजेरिया देशाचा एकूण जितका कर जमा होतो त्यापैकी दोन टक्के एकटे संदेसरा भरतात. यामुळे ते नायजेरियात आश्रित म्हणून गेले असले तरी आज तिथले सरकारच त्यांचे दास असल्यासारखे वागते. भारताने या संदेसरांना चौकशीसाठी परत पाठवा असा निरोप दिल्यावर नायजेरियन सरकार तो धुडकावून लावते. ही चौकशी राजकीय हेतूने प्रेरित आहे असा जबाब देते. यामुळे संदेसरा नायजेरिया आणि इतर देशांमध्ये मजेत धंदा करीत राहू शकतात.

### लाइनच लागेल

आता तर त्यांच्या भारतात उजळ माथ्याने परत येण्याचा मार्गही मोकळा होणार आहे. मधल्या काळात हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेऊन तिथे संदेसरा यांनी आपल्यावरचे सर्व आरोप खोटे आहेत असा कांगावा केला होता. तिथे आपल्या सरकारने संदेसरा यांच्या भानगडींचे पुरावे ठामपणे मांडणे आवश्यक होते. संदेसरा यांना कठोर शिक्षाच झाली पाहिजे असा आग्रहही धरणे आवश्यक होते. ते कितपत झाले याबाबत शंका आहे. आता न्यायालयाने ५ हजार कोटींवर मांडवली करून टाकण्यास सांगितले आहे. याबाबत बँका व सरकार आता काय भूमिका घेतात हे पाहावे लागेल. अन्यथा हा एक नवा पायंडाच पडेल. आज भारतीय बँकांची कर्जे बुडवून परदेशात पळून गेलेले अनेक जण लायनीत उभे आहेत. विजय मल्ल्या, नीरव मोदी, ललित मोदी ही त्यातली काही मोजकी नावे आहेत. संदेसराच्या निकालाचा हवाला देऊन मल्ल्या व हे इतर लोक भारतात येऊ पाहतील. तसे झाले तर ते घातक ठरेल. संदेसरा व या इतर भानगडबाजांनी कर्जे तर बुडवली आहेतच. पण त्यापूर्वी मुळात कर्जे घेताना खोटी कागदपत्रे सादर केली आहेत. कर्जे एका कारणासाठी घेतल्याचे दाखवून सट्टेबाजीत किंवा भलत्याच धंद्यांमध्ये कर्जांचा पैसा लावला आहे. त्यातून खासगी नफे कमावले आहेत. परदेशात काळा पैसा निर्माण केला आहे. किरकोळ दंड आकारून हे सर्व खून माफ होणार असतील तर आपण तरी कायदा का पाळावा असा विचार सामान्य माणूस करू लागेल. संदेसरा, मल्ल्या यांच्यासारखे पळून न गेलेले शेकडो कर्जबुडवे व भ्रष्ट धंदेवाले तर या देश शेकड्यांनी आहेत. अनिल अंबानींच्या पापांच्या कथा सध्या न्यायालयात रोज वाचल्या जात आहेत. त्यांच्याविरुध्द सीबीआय रोज गुन्ह्याचे नवे कलम वाढवत आहे. असे लोक संदेसरांच्या निकालाकडे बोट दाखवू शकतील. आम्हालाही न्यायालयाच्या गंगेत डुबकी मारून पापनाशनाची संधी मिळायला हवी असे म्हणू शकतील. यातूनपुढे जाऊन कर्जे घ्यायची असतात तीच मुळी बुडवण्यासाठी असा नियमच प्रस्थापित होईल. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना या सर्वांचा सम्यक विचार केला असेलच. तरीही या माफीतून जाणारा संदेश योग्य नाही. संदेसरा यांची बाजू मजबूत व न्यायाची असती तर त्यांनी दंड भरण्याऐवजी खटल्याच्या निकालाचा आग्रह धरला असता. त्याऐवजी तेच दंड भरायला उत्सुक आहेत असे दिसते. याचा अर्थ काय होतो हे कोणालाही कळेल. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल कळत नकळत गुन्ह्यावर पांघरूण घालणारा व गुन्हेगारांना भविष्यातील माफीची हमी देणारा ठरावा हे दुर्दैवी आहे.

**विचार**

# पाकिस्तान हुकुमशाहीच्या दिशेने..

***पाकिस्तानने संरक्षण दल प्रमुख असे पद निर्माण करत त्याची जबाबदारी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्याकडे सोपवली आहे. नवीन दुरुस्ती विधेयकांतर्गत, पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती मुनीर यांची या पदावर नियुक्ती करतील. यामुळे लष्करप्रमुखांना राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्वोच्च न्यायालयापेक्षा जास्त अधिकार मिळणार असल्याने पाकिस्तानमध्ये हुकूम शहाचा उदय होऊ घातला आहे.***




**प्रा. जयसिंग यादव**

पाकिस्तान संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करत आहे. त्यासाठी संसदेत २७ वे दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले आहे. पाकिस्तानी सरकारने सैन्यांमध्ये चांगले समन्वय स्थापित करण्यासाठी हे पद तयार केले जात आहे, असे सांगितले असले, तरी प्रत्यक्षात ते भारताचे अनुकरण आहे. भारतात जसे सरसेनाध्यक्षपद तयार करण्यात आले, तसे पाकिस्तानमध्ये हे पद तयार करण्यात आले; परंतु भारतात लोकशाही आहे आणि इथल्या सरसेनाध्यक्षांना पंतप्रधान आणि राष्ट्रपतींपेक्षा जास्त अधिकार नाहीत. पाकिस्तानमध्ये असीम मुनीर यांच्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली असून, आता त्यांच्या एकाच आदेशाखाली सेना, नौदल आणि हवाई दल काम करू शकतील. सामान्यतः, लष्करप्रमुखांना संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्त केले जाते. पंतप्रधान आणि राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती त्यांची नियुक्ती करतात. संरक्षण दलांचे प्रमुख हे तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख म्हणूनही ओळखले जातात; परंतु 'ऑपरेशन सिंदूर'मुळे हादरलेल्या पाकिस्तान सरकारने घाईगडबडीत केलेल्या घटनादुरुस्तीमुळे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान सरकारने मुनीर यांना 'फील्ड मार्शल' म्हणून बढती दिली. 'फील्ड मार्शल' हे पाकिस्तानी सैन्यातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च पद आहे. आता संविधानात सुधारणा करून मुनीर यांना तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख बनवण्यात आले आहे. या नवीन दुरुस्ती विधेयकांतर्गत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सल्ल्यानुसार अध्यक्ष आसिफ अली झरदारी हे मुनीर यांना 'सीडीएफ' पदावर नियुक्त करतील. ही घटनादुरुस्ती पाकिस्तानात लष्करी राजवटीच्या नवीन युगाची सुरुवात आहे.

भारताच्या फाळणीनंतर काही वर्षांनी पाकिस्तानमध्ये पहिला मार्शल लॉ लागू करण्यात आला. १९५८ मध्ये जनरल अयुब खान यांनी राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांना काढून टाकले आणि मार्शल लॉ लागू केला. १९५८ ते १९७१ पर्यंत चाललेला हा पाकिस्तानचा पहिला लष्करी हस्तक्षेप होता. या काळात २५ मार्च १९६९ रोजी अयुब यांनी पदाचा राजीनामा दिला आणि याह्या खानकडे सत्ता सोपवली. १९७७ मध्ये दुसरा लष्करी उठाव झाला, तेव्हा जनरल झिया-उल-हक यांनी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांचे सरकार उलथवून टाकले. झिया यांचे शासन १९७७ ते १९८८ पर्यंत चालले. १९९९ मध्ये तिसरा उठाव झाला. भारताकडून कारगिल युद्ध हरल्यानंतर जनरल परवेझ मुशर्रफ आणि तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यात संघर्ष निर्माण झाला. यामुळे १९९९ मध्ये मुशर्रफ यांनी लोकशाही सरकार उलथवून टाकले. मुशर्रफ यांचे शासन २००८ पर्यंत टिकले. हा सर्व इतिहास पाहिला, तर पाकिस्तानमध्ये सत्तेची चावी लष्कराकडे आहे, हे स्पष्ट होते. असे असले, तरी २००८ पासून पाकिस्तानमध्ये कोणत्याही लष्करी अधिकाऱ्याने सत्तेचे सूत्र हाती घेतलेले नाही. अर्थात सत्तेची सुत्रे नेहमीच लष्करी मुख्यालयात बसलेल्या जनरलकडे राहिली आहेत.

पाकिस्तानमध्ये लोकशाही सरकारने लष्कराला आव्हान देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते उलथून टाकण्यात आले. संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी अलिकडेच सध्याच्या सरकारचे वर्णन 'हायब्रिड सरकार' असे केले. हायब्रिड म्हणजे ते अशा व्यवस्थेचा संदर्भ देतात, ज्यामध्ये लष्करी नेतृत्व आणि नागरी सरकार एकत्रितपणे निर्णय घेतात. आता मात्र ही परिस्थिती बदलणार आहे. मे महिन्यात भारतासोबत झालेला पाकिस्तानचा लष्करी संघर्ष आणि अफगाणिस्तानसोबतच्या अलिकडच्या सीमा तणावामुळे संरक्षणाचे महत्त्व वाढले असून खर्चाची गरजही वाढली आहे. १९७३ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांनी लष्करप्रमुख मुनीर यांची 'फील्ड मार्शल' म्हणून नियुक्ती केली आहे आणि आता त्यांना 'संवैधानिक संरक्षण' प्रदान करणे आवश्यक होते. त्यासाठी घटना दुरुस्ती करण्यात आली. गेल्या वर्षी पाकिस्तान लष्कर कायद्यातील दुरुस्तीने लष्करप्रमुखांचा कार्यकाळ वाढवला होता; परंतु त्यांच्या नियुक्तीच्या वेळी मुनीर यांच्यासाठी तीन वर्षांची अधिसूचना जारी करण्यात आली होती. 'ऑपरेशन सिंदूर'ची धास्ती घेतलेल्या पाकिस्तानने घटनेमध्ये २७ वी दुरुस्ती केली. हे करताना तिथल्या सरकारने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. लष्करप्रमुखांकडे जादा अधिकार सोपवताना पाकिस्तानचे लोकनियुक्त सरकार त्यांच्या हातची कळसुत्री बाहुली ठरणार आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारावर अंकुश आला आहे. नवीन कायदा लष्करप्रमुखांना निरंकुश सत्ता देईल.

या निर्णयाविरोधात माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पक्ष रस्त्यावर उतरला असला, तरी त्याला काहीच अर्थ नाही. हे विधेयक सशस्त्र दलांशी संबंधित असलेल्या संविधानाच्या कलम २४३ मध्ये सुधारणा करते. या विधेयकाअंतर्गत राष्ट्रपती पंतप्रधानांशी सल्लामसलत करून लष्करप्रमुख आणि संरक्षणप्रमुखांची नियुक्ती करतील. लष्करप्रमुख आता संरक्षण दलाचेही प्रमुख असतील. शिवाय, संरक्षण प्रमुख पंतप्रधानांशी सल्लामसलत करून राष्ट्रीय धोरणात्मक कमांडच्या प्रमुखाची नियुक्ती करतील. मुनीर यांना आधीच 'फील्ड मार्शल'चा दर्जा देण्यात आला होता. ताज्या संविधान दुरुस्ती विधेयकामुळे त्याला घटनात्मक मान्यता मिळाली आहे. मुनीर यांच्याकडे 'फील्ड मार्शल'चे पद आणि विशेषाधिकार आयुष्यभर राहतील. याव्यतिरिक्त, संयुक्त 'चीफ ऑफ स्टाफ कमिटी'च्या अध्यक्षपदाची पदवी रद्द केली जाईल. नवीन कायदा सरकारला फील्ड मार्शल, एअर फोर्स मार्शल आणि 'ॲडमिरल ऑफ द फ्लीट' या पदांवर अधिकाऱ्यांना बढती देण्याचा अधिकार देतो. पाकिस्तानच्या इतिहासात या पदावर बढती मिळालेले ते दुसरे सर्वोच्च लष्करी अधिकारी बनले. याव्यतिरिक्त, लष्करी समन्वय सुधारण्यासाठी त्यांनी संरक्षण दल प्रमुख पद निर्माण करण्याची योजना आखली. नव्या घटनादुरुस्तीनंतर पंतप्रधानही 'फील्ड मार्शल'ला काढून टाकू शकत नाहीत. पंतप्रधान 'राष्ट्रीय स्ट्रॅटेजिक कमांड'च्या कमांडरची नियुक्ती करतील. त्यामुळे पाकिस्तानच्या अणु कमांड रचनेवर लष्करी नियंत्रण स्थापित होईल. शिवाय, पंतप्रधानांना 'फील्ड मार्शल'ची पदवी काढण्याचा, महाभियोग चालवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राहणार नाही. निवृत्तीनंतर फील्ड मार्शलना अतिरिक्त जबाबदाऱ्या देता येतील.

शरीफ यांच्या सरकारने लष्करप्रमुख आणि फील्ड मार्शल यांच्या पदांना संवैधानिक दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मुनीर यांच्या अधिकारांमध्ये वाढ करण्यासाठी एक घटनात्मक सुधारणा आणण्यात आली आहे. संसदेत २७ व्या घटनात्मक दुरुस्तीमुळे लष्करप्रमुखांना प्रचंड अधिकार मिळणार आहेत. या दुरुस्तीमुळे संरक्षण दल प्रमुख हे एक नवीन पद निर्माण होईल. मुनीर हे देशाच्या राजकीय आणि न्यायव्यवस्थेला हादरवून टाकणाऱ्या एका हालचालीत पुढे जात आहेत. त्यांच्याकडे पंतप्रधानांपेक्षा जास्त अधिकार असल्याचे म्हटले जात असले, तरी ते २७ व्या घटनादुरुस्तीद्वारे स्वतःसाठी आजीवन सुरक्षा भिंत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या दुरुस्तीमुळे 'फील्ड मार्शल'ना आजीवन विशेषाधिकार मिळतील आणि त्यांच्याविरुद्ध आयुष्यभर कोणताही खटला दाखल करता येणार नाही. देशाला झालेल्या नुकसानासाठी त्यांना जबाबदार धरले जाण्याची भीती आहे, म्हणून ते या वादग्रस्त दुरुस्तीद्वारे स्वतः साठी आजीवन संरक्षण सुनिश्चित करत आहेत. या हालचालीवरून असे दिसून येते, की पाकिस्तानचे लष्करप्रमुख आता जबाबदारीच्या पलिकडे राहू इच्छितात. अर्थात या खेळामागे अमेरिकेचा हात असू शकतो. मात्र एखादा फुगा अशा प्रकारे किती फुगवता येतो, याला मर्यादा असतात, हे पाकिस्तानी प्रशासक विसरलेले दिसतात.

# सागरी सुरक्षेसाठी एक पाऊल पुढे

रायगड पोलिसांनी सागरी सुरक्षेसाठी सागरी कबड्डी स्पर्धा आयोजित करून मच्छिमार आणि पोलिस यांच्यातील विश्वासाचे नाते अतुट करण्याचा प्रयत्न केला. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेतला. सागरी सुरक्षेसाठी आधुनिक सांधनाचा वापर करण्याचादेखील प्रयत्न रायगड पोलिसांनी केला आहे. त्यामध्ये इगल आय ॲप वरदान ठरत असून या ॲपच्या माध्यमातून तीन हजारहून अधिक बोटींसह खलाशी, तांडेल यांची माहिती पोलिसांकडे उपलब्ध आहे. त्यामुळे सागरी सुरक्षेसाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न यातून रायगड पोलिसांनी केला आहे. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण वाढत आहे. तसेच पर्यटनाच्या दृष्टीनेदेखील जिल्हा महत्वाचा ठरत आहे. जिल्ह्यात दहा लाखाहून अधिक पर्यटक दरवर्षी भेटी देतात. जिल्ह्यामध्ये नोकरी व्यवसायासाठी वेगवेगळ्या तालुक्यातून, जिल्ह्यातून, राज्यातून येणाऱ्यांची संख्यादेखील वाढली आहे.

जिल्ह्यात मासेमारीच्या नावाचे डिझेल तस्करीदेखील वाढण्याचे संकट आहे. बांग्लादेशी घुसखोरदेखील नोकरी व्यवसायानिमित्त जिल्ह्यात येण्याचे संकट आहे. डिझेल तस्करीच्या नावाने दहशतवादींची घुसखोरी होण्याची भिती आहे. श्रीवर्धन येथील शेखाडी खाडीकिनारी १९९३ मध्ये आरडीएक्सचा साठा सापडला होता. त्यामुळे किनाऱ्यांची सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. मुंबईत २६/११ ला दहशतवादी हल्ला झाला, तोही सागरी मार्गानेच झाला होता. सागरी मार्गाने होणाऱ्या गैरप्रकारासह दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी इगल आय अप नावाचा एक नवीन आणि अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील बोटींसह मालक, खलाशी आणि तांडेल यांची माहिती एका क्लिकवर सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे हा ॲप सागरी सुरक्षेसाठी वरदान ठरत आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलो मीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. जिल्ह्यात अलिबाग, मुरूड, काशीद, मांडवा, नागाव, श्रीवर्धन ही महत्वाची सागरीकिनारे आहेत. या ठिकाणी नागरिकांसह पर्यटकांची वर्दळ कायमच असते. मागील सहा महिन्यापूर्वी अलिबागसह काशीद, श्रीवर्धन येथील समुद्रकिनारी चरसचा साठा सापडला होता. त्यामुळे सागरी सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सहा महिन्यापूर्वी पोलीस अधीक्षक म्हणून पदभार हाती घेतल्यावर जिल्ह्यातील सागरी सुरक्षेवर भर देण्यास सुरुवात केली. मच्छिमार, मासेमारी करणारी मंडळी,किनाऱ्यावरील तिसरा डोळा म्हणून ओळखले जाते. किनाऱ्यावरच यांचा वावर मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे किनाऱ्यावरील प्रत्येक संशयीत हालचालीवर यांचे लक्ष अधिक असते.

**अंतरा पारंगे**

रायगड पोलिसांच्या मार्फत सागरी सुरक्षेच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. मागील दोन महिन्यांपुर्वी रायगड पोलीस, सुरक्षा शाखा यांच्या वतीने सागरी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून हा नाविन्य उपक्रम राबविण्यात आला होता. सोमवारी (दि.१०) दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ एका उभ्या असलेल्या गाडीमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर हाय अलर्ट जारी करण्यात आला होता. रायगडचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. रायगड जिल्ह्याला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी १९ नोव्हेंबरपासून जिल्ह्यामध्ये दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान सागरी सुरक्षा विभागाच्या माध्यमातून राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून संशयास्पद बोटींवरील हालचालीवर लक्ष ठेवण्याबरोबरच रस्ते, खाडी, नदी, समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर नजर ठेवण्याचे काम सागरी सुरक्षा विभागाकडून करण्यात आले.

पोलीस आणि सागरी किनाऱ्यावर राहणारा कोळी समाज, मच्छिमार यांच्यामध्ये अतुट विश्वास निर्माण व्हावा, यासाठी सागरी कबड्डी स्पर्धा घेण्यात आली होती. जिल्ह्यातील बोटींसह खलाशी, तांडेल यांची सखोल माहिती मिळावी यासाठी रायगड पोलिसांनी चार वर्षांपूर्वी एक अनोखा उपक्रम हाती घेतला. सागरी सुरक्षा शाखेच्या माध्यमातून हा उपक्रम घेण्यात आला होता. इगल आय ॲप नावाच्या आधुनिक साधनांचा वापर करीत सागरी सुरक्षेवर भर टाकण्याचा प्रयत्न केला. सागरी सुरक्षेत सागरी दहशतवाद, अवैध मासेमारी, तस्करी रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी एक नवे पाऊल उचलले. पोलीस आणि सागरी किनाऱ्यावर राहणारा कोळी समाज, मच्छिमार यांच्यामध्ये अतूट विश्वास निर्माण व्हावा, यासाठी सागरी कबड्डी स्पर्धा घेण्यात आली होती. जिल्ह्यातील बोटींसह खलाशी, तांडेल यांची सखोल माहिती मिळावी, यासाठी रायगड पोलिसांनी चार वर्षांपूर्वी एक अनोखा उपक्रम हाती घेतला. बोटीचे मालक, खलाशी, तांडेल यांची माहिती या ॲपमध्ये अपलोड करण्यात आली. प्रत्येक बोटीला ईगल ॲप नावाचे बारकोड देण्यात आले. एकूण तीन हजारहून अधिक बोटींना हे बारकोड पोलीसांच्या मार्फत देण्यात आले आहे. इगल आय ॲप नावाच्या आधुनिक साधनांचा वापर करीत सागरी सुरक्षेवर भर टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**लोकसंसद**

### राष्ट्रीय मोहिम, पण स्थानिक भाषेचा विसर

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुरु झालेल्या 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' या मोहिमेची बातमी अलीकडे वाचली. स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्याचा उद्देश नक्कीच कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागात शौचालय वापर आणि देखभाल याबाबत सातत्याने जनजागृती होणे आवश्यकच आहे. परंतु, अशा देशपातळीवर राबवल्या जाणाऱ्या मोहिमांचे एक समान वैशिष्ट्य जाणवतेमोहिमेचे नाव प्रामुख्याने हिंदीतच ठेवले जाते. अशा उपक्रमांमध्ये स्थानिक भाषेला हक्काचे स्थान मिळत नाही, ही खंत आहे. महाराष्ट्रात मोहीम राबवायची, नागरिकांना सहभागी करायचे, पण नाव मात्र हिंदीत ठेवायचेहे कितपत सयुक्तिक? मोहिमेचा उद्देश चांगला आहे, यात शंका नाही. पण नाव स्थानिक भाषेत असले, तर सामान्य माणसात आपलेपणाची भावना निर्माण होते, सहभाग वाढतो आणि संदेश अधिक परिणामकारकपणे पोहोचतो. 'हमारा शौचालय'पेक्षा 'आपले शौचालयआपले भविष्य' ही संकल्पना मराठी माणसाला अधिक सहज पटणारी आणि जवळची ठरली असती. **दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### शुक्री कॉनराड यांचे वर्णद्वेषी वक्तव्य

कोलकाता कसोटी सामना जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने आता दुसऱ्या गुवाहाटी कसोटीतही मोठा विजय मिळवला आणि भारताविरुद्धच्या मालिकेत ३१ वर्षानंतर २-०असे निर्भेळ यश मिळवले. या मालिकेत भारतीय संघाने अतिशय निराशजनक खेळ करून आपली उरलीसुरली पत घालवली. मात्र तत्पूर्वी दक्षिण आफ्रिकेचे माजी क्रिकेटपटू आणि सध्या त्यांच्या क्रिकेट संघाचे प्रशिक्षक असलेले शुक्री कॉनराड यांनी गुवाहाटी सामन्याच्या चौथ्या दिवसानंतरच्या पत्रकार परिषदेत बोलताना भारतीय संघाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. भारतीय संघाला शक्य तितका अधिक वेळ मैदानात क्षेत्ररक्षण करायला लावून थकवायचे, थोडक्यात सांगायचे तर 'भारतीय संघाने आमच्यासमोर लोटांगण घालावे'(वी वॉन्टेड देम टू रिअली ग्रोवेल) असे ते म्हणाले. शुक्री कॉनराड यांच्या या वादग्रस्त टिप्पणीमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. काही जाणकारांच्या मते 'ग्रोवेल' या शब्दाला वांशिक अर्थ असून दक्षिण आफ्रिकेतील गुलामगिरी आणि वर्णद्वेषाचा संदर्भ या टिप्पणीशी होता. कारण 'ग्रोवेल हा शब्द इंग्लंडचे तत्कालीन कर्णधार टोनी ग्रेग (मूळ दक्षिण आफ्रिकन) यांनी १९७६ साली वेस्ट इंडिजच्या कृष्णवर्णीय खेळाडूंना कमी लेखण्यासाठी जाणीवपूर्वक वापरला होता. आता दोन्ही कसोटी साम न्यातील भारतीय संघाच्या सुमार कामगिरीमुळे शुक्री कॉनराड यांच्या ओठी तो शब्द उफाळून आला असावा. वर्णद्वेष कायद्याने गेला असला तरी अनेकांच्या मनातून अजूनही तो गेला नाही हेच खरे! **–प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**दिनविशेष**

# विश्वनाथ प्रताप सिंग भारताचे ७ वे पंतप्रधान

भारताचे सातवे पंतप्रधान सामाजिक कार्यकर्ते व राजनीतिज्ञ विश्वनाथ प्रताप सिंग यांचा जन्म २० जून १९३२ रोजी इराला भारताचे सातवे पंतप्रधान म्हणून असली तरी त्यांचे वडील राजे बहादूर रामगोपाल है अलाहावाद जिल्ह्यातील एका लहान संस्थानचे अधिपती विश्वनाच प्रताप सिंग होते. वयाच्यापावत्या वर्षी मंडाच्या संस्थानाधिपतीनी सिगानते होते त्यांना दत्तक घेतले आणि योग्य ते शिक्षण दिले. त्यांचे दत्तकपिता १९७२ मध्ये वारले आणि व्ही. पी. सिंग महाचे अकराव्या वर्षी राजे झाले संस्थान विलीन होईपर्यंत ते महाराजा होते. त्यांनी उच्चशिक्षण पुणे व अलाहाबाद विद्यापीठात घेऊन बी ए. बी. एस्सी व पल्लू बी पदव्या संपादन केल्या. विद्यार्थिदशेत ते वाराणसीतील उदयप्रताप महाविद्यालयात विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष होते त्यांचा विवाह सीताकुमारी या शाही घराण्यातील युवतीशी झाला त्यांना दोन अपत्ये आहेत विनोबा भावेंच्या भूदान आंदोलनात त्यांनी सहभाग घेऊन आपल्या अखत्यारीतील पसाना हा ग्रामीण परिसर भूदान चळवळीस दान केला. त्यानंतर ते सक्रिय राजकारणाकडे वळले ते १९६० मध्ये काँग्रेस पक्षात प्रविष्ट झाले. सुरुवातीस त्यांच्याकडे उत्तर प्रदेशातील उपचिटणीस, चिटणीस अशी पदे देण्यात आली पुढे ते काँग्रेसतर्फे विधिमंडळावर निवडून आले. तसेच ते अलाहाबाद विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. त्यांच्याकडे १९७०-७१ मध्ये काँग्रेसचे प्रतोदपद देण्यात आले. पुढे केंद्रीय मंत्रिमंडळात ते उपवाणिज्य मंत्री, नंतर त्याच खात्याचे कॅबिनेट मंत्री झाले. या दरम्यानत्यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली त्यानंतर त्यांची लोकसभेवर निवड झाली मध्यंतरी त्यांची उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून श्रीमती इंदिरा गांधीनी निवड केली. त्यानी काही काळ उत्तर प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले (१९८४). त्यांची काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीवर निवड झाली आणि पुन्हा ते लोकसभेवर निवडून गेले. त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात अर९८४-८६) आणि संरक्षण ही खाती कार्यक्षमरीत्या सांभाळली. तथापि पंतप्रधानांशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी त्यांच्यावर मतुमचे शासन अत्यंत भ्रष्टाचारी आहे, असा आरोप केला. परिणामत. त्याना काँग्रेस पक्षातून बाहेर पडण्याचा आदेश देण्यात आला. त्यानी जनमोचों या नवीन पक्षाची स्थापना केली पुढे त्याचे विसर्जन जनता दलात करून ते जनता दलातील एक प्रभावी नेते झाले त्यानंतर समाजवादी जनता दल असे संयुक्त पक्षाचे नामकरण करण्यात आले (१९८८-१०) या पक्षाने सार्वत्रिक निवडणुकीत भरघोस वाह मिवाकिले, पण स्वबळावर शासन स्थापण्याइतपत त्यांच्याकडे संख्याबळ नव्हते म्हणून भा. ज. प. व कम्युनिस्ट पक्ष यांच्या सहकायनि नेशनल फ्रंट (राष्ट्री य आघाडी) स्थापण्यात आली. तिचे निमंत्रक यही पी. सिंग होते. या आघाडीने त्यांना नेतृत्व दिले आणि त्ही. पी. सिंग पंतप्रधान झाले त्यांनी अनेक सामाजिक सुधारणांच्या योजना मांडल्या. त्यांपैकी मंडल आयोगाने १९८० मध्ये इतर मागासवर्गीय समाजासाठी आरक्षण सुचविलेल्या २० टक्क्यांचा समावेश होता. याविषयी काही नेत्यांनी व्ही. पी. सिंग यांची बाजू क्लीप काँग्रेससह अनेक पक्षांनी या विधेयकाला संसदेत विरोध केला. उत्तर भारतात विशेषतः बिहार, उत्तर प्रदेश येथे अनेक विद्यार्थी नाराज झाले. शिवाय भा. ज. प. अध्यक्ष अडवानी यांना रथयात्रेच्या निमित्ताने अटक करण्यात आली होती. त्यामुळे भा. ज. प.ने व्ही. पी. सिंगांचा पाठिंबा काढून घेतला. परिणामी व्ही. पी. सिंग यांचे सरकार गडगडले आणि त्यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला. अखेर मंडल आयोगाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अन्वयार्थ आणि निर्णय यांकरिता प्रविष्ट झाले. सर्वोच्च न्यायालयाने १६ नोव्हेंबर १९९२ रोजी व्ही. पी. सिंग यांचा या संदर्भातील सुधारणा ठराव काही फेरबदलांसह संमत केला. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली; तथापि प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते राजकारणातून अलिप्त राहिले. मंझिलसे जादा सफर हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे विश्वनाथ प्रताप सिंग यांचे २७ नोव्हेंबर २००८ रोजी निधन झाले.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

| रसायनी | प्रतिनिधी |

ब्रम्हलिन हभप गुरुवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाआशिर्वादाने तसेच, वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा आयोजित श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सुवर्ण जन्मोत्सव तपपुर्ती सोहळा साजरा होत आहे. यानिमित्त श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह मोहोपाडा येथील जनता विद्यालय मैदानावर बुधवार दि.२६ पासून सुरु झाला आहे. या सप्ताहात प्रवचन, हरिपाठ तसेच सायंकाळी ७ ते ९ वाजता सुप्रसिध्द महाराजांची किर्तने होणार आहेत. बुधवार दि.३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते १२ वा. हभप राम महाराज सोलापूरकर (जोग महाराज) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सप्ताहासाठी वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा, खालापूर व पनवेल तालुका अथक परिश्रम घेत आहे.

# कचरा संकलनाचा दिखावा

## • करारनाम्यातील अटीशर्तींचे उल्लंघन; ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग

| पालघर | प्रतिनिधी |



पालघर शहरातील कचरा समस्या सोडवण्याच्या कामासाठी नगरपरिषदेने सुमारे ५० लक्ष रुपये खर्च मंजूर केला होता. हा खर्च सद्यस्थितीत दर महिन्याला ५८ लक्ष रुपयांपर्यंत पोहोचला असून शहरात गोळा होणाऱ्या कचऱ्याची ओला व सुका अशी वर्गवारी न करता एकत्रितपणे डम्पिंग ग्राउंड येथे टाकण्यात येत आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग पडल्याचे चित्र असून नवीन कचरा ठेक्यासंदर्भात केलेल्या करारनाम्यातील अनेक अटी शर्तींचे उल्लंघन होताना दिसून येत आहे.

पालघर नगरपरिषदेने १४व्या वित्त आयोगातून घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नगरपरिषद क्षेत्रातील निवासी, वाणिज्य, शैक्षणिक, धार्मिक, औद्योगिक इत्यादी आस्थापनांमध्ये निर्माण होणारा दैनंदिन कचरा स्त्रोताच्या ठिकाणाहून ओला व सुका स्वरूपात संकलित करून स्वतंत्ररीत्या नगर परिषदेने निश्चित करून दिलेल्या जागेवर वाहतूक करणे, असा सुधारित ठेका मे २०२३ पासून देण्यात आला होता. शहराच्या पूर्व व पश्चिम भागातील ठेका उचलण्यासाठी करण्यात आलेल्या स्वतंत्र निविदेमध्ये कचरा उचलण्यासोबत नालेसफाई करणे, झाडझुड करणे, दैनंदिन रस्ते सफाईमधून निर्माण झालेला घनकचरा, मृत पशु इत्यादी कचऱ्याचे निश्चित केलेल्या ठिकाणी वाहतूक करणे हे अंतर्भूत होते. या कामाला २९ डिसेंबर २०२२ च्या सर्वसाधारण सभेत मंजूर देण्यात आली होती. तसेच त्याची अंमलबजावणी मे २०२३ पासून सुरू करण्यात आली होती.

काही दिवसांच्या दिखाव्यानंतर शहरात निर्माण होणारा कचरा एकत्रितपणे गोळा केला जात आहे. पालघर खारेकुरण मार्गावर असणाऱ्या नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राउंडच्या ठिकाणी या कचऱ्याची एकत्रित रास टाकली जाते. या ठिकाणी दिखाव्यापुरती कंपोस्टिंग व कचऱ्यातील प्लास्टिक वेगळे काढण्याचे काम करण्यात येत आहे.

> “शहरातील कचरा ठेका संदर्भात त्रुटी व अनियमितता असल्याचे दिसून आल्याने निवडणूक संपल्यानंतर संबंधितांशी चर्चा करून करारनाम्यातील अटीशर्तींची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या कामी ठेकेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न लाभल्यास त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.”
> – प्रशांत जाधव, मुख्याधिकारी पालघर

कचरा उचलण्याच्या ठेक्यामध्ये समाविष्ट अनेक बाबींकडे दुर्लक्ष केले जात असून यासंदर्भात नगर परिषदेने अनेकदा संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावल्याचे सांगण्यात आले.

## क्लोरिन वायू गळतीमुळे एकाचा मृत्यू

| ठाणे | प्रतिनिधी |

वसईत येथे क्लोरिन सिलेंडरमधून वायुगळती होऊन एकाचा मृत्यू झाला, तर १९ जण त्यामुळे बाधित झाले. देव परडीया (५९) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

दिवाणमान येथे वसई-विरार महानगरपालिकेची पाण्याची टाकी असून त्याद्वारे परिसरात पुरवठा केला जातो. काही दिवसांपूर्वी या टाकीचा व्हॉल्व बिघडला होता. मंगळवारी (दि.२५) पालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पथक दुरुस्तीसाठी गेले होते. त्याच्या पाठीमागच्या बाजूला एका खोलीत १५ वर्षे जुनी क्लोरिन वायूची टाकी ठेवली होती. दुरुस्तीचे काम सुरू असताना अचानक एका कर्मचाऱ्याचा धक्का क्लोरिनच्या टाकीला लागला आणि ही टाकी जमिनीवर कोसळली. क्लोरिनची टाकी खाली कोसळताच त्यातून मोठ्या प्रमाणावर वायूची गळती सुरू झाली. परिसरामध्ये हा वायू पसरल्याने नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत होता. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांमध्येही घबराट पसरली. या विषारी वायूमुळे १९ जणांना त्रास सुरू झाल्याने त्यांना रुग्णाल यात दाखल केले.

## महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिस्तीचे धडे

| ठाणे | प्रतिनिधी |




विविध प्रकारच्या कामांसाठी सर्वसामान्य नागरिक ठाणे महानगरपालिकेची पायरी चढतात तेव्हा त्यांना अनेकदा वाईट अनुभव येतो. अधिकारी, कर्मचारी उद्धटपणे बोलतात. आता पालिकेच्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लवकरच शिस्तीचे धडे दिले जाणार आहेत. त्यात ओळखपत्र तसेच गणवेश बंधनकारक केले असून नागरिकांशी सौजन्याने वागा, असे स्पष्ट आदेशही देण्यात आले आहेत.

पालिकेच्या कामकाजातील वाढता ढिसाळपणाविरोधात काँग्रेसने मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्याकडे निवेदन देत पाठपुरावा केला होता. अधिकारी कार्यालयात वेळेत उपलब्ध नसणे, भेट मिळाल्यास नागरिकांचे म्हणणे न ऐकणे, तसेच प्रशासकीय माहिती वेबसाईटवर आणि दर्शनी भागात न लावणे या तक्रारी सातत्याने वाढत होत्या. या सर्व प्रकरणांबाबत पिंगळे यांनी तक्रार केली होती. त्याची दखल घेत अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी मान्य करत कठोर कारवाईचे आश्वासन दिले आहे.

यामध्ये प्रशासकीय माहिती वेबसाईटवर स्पष्टपणे प्रकाशित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अभ्यागतांसाठी अधिकाऱ्यांनी निश्चित भेटीची वेळ कार्यालयाबाहेरील फलकावर नमूद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नागरिकांचे म्हणणे शांतपणे ऐकून त्यांना पुरेसा वेळ देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, कार्यालयातून बाहेर जाताना एसी, पंखे आणि दिवे बंद ठेवण्याचे निर्देश परिपत्रकात समाविष्ट आहेत.

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सुविधा

| खांब | प्रतिनिधी |



दीपक फाउंडेशन रोहा आणि ॲपकोटेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त पुढाकारातून उमरोली व देहरंग येथील जि.प. शाळांमध्ये अत्यावश्यक सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे उमरोली शाळेत वॉटर फिल्टर तर देहरंग शाळेत सौर ऊर्जेवर चालणारी ऑफ-ग्रिड प्रणाली आणि संगणक यंत्रणेचे स्थापत्य पूर्ण करण्यात आले.

या कार्यक्रमास अपकोटेक्स कंपनीचे प्लांट हेड जी.आर. मनमोडे, सेफ्टी हेड के. एन. तंगडे, एचआर हेड अमृत अंबुलकर, प्लांट हेड एस.जी.बरई, मॅनेजर इनिशिएटिव्हज एस.पी.पेणकर आदींसह शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी नव्या सुविधांचे स्वागत करताना अपकोटेक्सच्या सामाजिक बांधिलकीचे विशेष कौतुक केले. दीपक फाउंडेशन रोहा यांच्यातर्फे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटरज्ञ अनिकेत निकम व प्रोग्राम मॅनेजर अभिलाष नस्वले यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट समन्वयन केले.

## मुंबईत भरवस्तीत बिबट्याचा मुक्तसंचार

**मुंबई :** नॅशनल पार्कलगत असणाऱ्या मालाड पूर्व येथील न्यू दिंडोशी रॉयल हिल्स को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी आणि परिसरातही बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याचे समोर आले आहे. या परिसरात सुमारे पाच हजार रहिवासी वास्तव्य करीत आहेत. सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या दिवसा आणि रात्री फिरत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण आहे.

## महामार्गावरील सुरक्षा रेलिंगची चोरी

| पालघर | प्रतिनिधी |

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मुख्य महामार्ग आणि सेवा रस्त्यांमध्ये बसवलेल्या लोखंडी सुरक्षा रेलिंगची मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे महामार्ग प्राधिकरण, गस्ती पथक आणि महामार्ग पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सेवा रस्त्यांवरील वाहनांना मुख्य मार्गाच्या वेगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी ही रेलिंग्ज बसवण्यात आली होती. मात्र, बसवल्यानंतर काही महिन्यांतच त्या मोठ्या प्रमाणात चोरीला गेल्या आहेत. चारोटी हद्दीतील एशियन पेट्रोल पंप ते अल्फा हॉटेलपर्यंतच्या पट्ट्यात चोरीचे प्रमाण सर्वाधिक आहे. मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवरील लोखंडी रेलिंग्ज जवळपास पूर्णपणे चोरीला गेली आहेत. महामार्गासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या ठिकाणी लोखंडी रेलिंगचे मोठे तुकडे चोरीला जात असतानाही, महामार्ग प्रशासन किंवा महामार्ग पोलिसांना त्याची कल्पना नसणे ही चिंतेची बाब आहे.

## महिलांना घरघंट्यांचे वाटप

**गुहागर :** शृंगारतळी येथे रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांचे प्रवचन रविवारी मोठ्या उत्साहात झाले. यावेळी सामाजिक उपक्रमांतर्गत गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी ११ घरघंट्यांचे वाटप करण्यात आले. पाटपन्हाळे हायस्कूलसमोरील कै. सदाशिव बापूशेठ वेल्हाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमावेळी हजारो भक्तांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन रामानंद संप्रदाय भक्तसेवा मंडळ तसेच रत्नागिरी जिल्हा सेवा समिती यांच्यातर्फे करण्यात आले. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी उपस्थित होते.

## बेशिस्त वाहनचालकांमुळे अपघातांचा धोका

| नवी मुंबई | प्रतिनिधी |



पामबीच मार्गावर विरुद्ध दिशेने वाहने चालवण्याच्या घटना सातत्याने वाढत असून, बेशिस्त वाहनचालकांच्या या धोकादायक प्रवृत्तीमुळे अपघातांचा धोका वाढत आहे. या ठिकाणी वाहतूक पोलिसांच्या मर्यादित उपस्थितीमुळे नियमभंग करणाऱ्यांना अभय मिळत असल्याने नागरिक आणि नियमित वाहनचालकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

पामबीच गॅलेरिया मॉल आणि सतरा प्लाझादरम्यानच्या रस्त्यावर चुकीच्या दिशेने वाहन चालवणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. सतरा प्लाझा सिग्नलवरून गॅलेरिया मॉलकडे जाण्यासाठी कोपरी सिग्नलमार्गे वळसा घालावा लागतो. हा वळसा टाळण्यासाठी अनेक वाहनचालक थेट सतरा प्लाझावरूनच विरुद्ध दिशेने वाहन चालवण्याचा मार्ग स्वीकारत आहेत. परिणामी सरळ दिशेने नियमानुसार वाहन चालवणाऱ्या वाहनचालकांना वारंवार वेग कमी करावा लागणे, अचानक ब्रेक मारावे लागणे किंवा रस्त्याच्या कडेला गाडी हलवणे यांसारख्या प्रसंगांचा सामना करावा लागत असून, त्यामुळे अपघाताचा धोका तर वाढतोच पण वाहतूक कोंडीही निर्माण होते. या भागात वाहतूक पोलिसांची देखरेख जवळपास नसल्याने काही वाहनचालकांनी चुकीच्या दिशेने जाणे हेच नित्याचे केले आहे, असे स्थानिक वाहनचालकांचे म्हणणे आहे. वाहनचालकांच्या मते अशा ‘शॉर्टकट’ प्रवृत्तीमुळे मुख्य मार्गावरील वाहतूकप्रवाह विस्कळीत होतो आणि अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

## कातळशिल्पांची स्वच्छता

**सिंधुदुर्ग :** जागतिक वारसा सप्ताहानिमित्त घुंगुरकाठी संस्थेच्या पुढाकाराने मंगळवारी (दि.२५) कुडोपी येथील कातळशिल्पांची स्वच्छता मोहीम पार पडली. मालवण येथील युथ बिटस् फॉर क्लायमेटचे कार्यकर्ते आणि आचरा कॉलेज ऑफ मॅनेजमेंटचे एनएसएस स्वयंसेवक अशा तीस जणांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. दरवर्षी १९ ते २५ नोव्हेंबर हा आठवडा जागतिक वारसा सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या सप्ताहात पुरातन वारसा ठिकाणांना भेटी देणे, त्यांची माहिती घेणे, प्रचार करणे, स्वच्छता मोहीम असे उपक्रम राबवले जातात.

**केंद्र शासनाचे नवीन धोरण** | **राज्यभर व्हीएसके प्रणाली लागू**

# शाळांची हजेरी होणार डिजिटल पद्धतीने

| रत्नागिरी | प्रतिनिधी |




सर्व शाळांमध्ये आता विद्यार्थी आणि शिक्षकांची हजेरी विद्या समीक्षा केंद्र (व्हीएसके) प्रणालीवरच नोंदवावी लागणार आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने शाळांना विस्तृत मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. डिजिटल पद्धतीने उपस्थिती नोंदवण्याचा निर्णय यावर्षीपासूनच लागू केला आहे. केंद्र शासनाच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून व्हीएसके प्रणाली राज्यभर लागू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपस्थितीवर थेट नियंत्रण ठेवणे, बास्तविक उपस्थितीचे विश्लेषण करणे आणि शाळा पातळीवरील प्रशासकीय पारदर्शकता वाढवणे या उद्दिष्टासाठी ही प्रणाली सक्षम ठरणार असल्याचे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे. आता राज्यातील सर्व शाळांनी ऑफलाईन पद्धतीला पूर्णविराम देत ऑनलाईन हजेरी प्रणाली स्वीकारण्याची तयारी सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

संचालनालयाने एक परिपत्रक काढत नव्या सूचनांनुसार प्रत्येक शाळेने व्हीएसके प्रणालीचा दैनंदिन वापर करुन विद्यार्थ्यांची तसेच शिक्षकांची उपस्थिती नोंदवणे बंधनकारक आहे. उपस्थिती नोंदीत कोणतीही तांत्रिक त्रुटी किंवा विलंब होऊ नये यासाठी शिक्षकांनी गुगल प्ले स्टोअरवरील महास्टुडंट ॲप हे अधिकृत ॲप डाऊनलोड करुन त्यावर शाळेचा बूडायस क्रमांक व प्राथमिक माहिती नोंदवावी, असे कळवण्यात आले आहे.

ॲपमध्ये शाळेची माहिती प्रदर्शित झाल्यानंतर ती अचूक असल्याची खातरजमा करून पुढील टप्पा पूर्ण करावयाचा आहे. त्यानंतर संबधित वर्ग शिक्षकांनी स्वतः चा शालार्थ आयडी प्रविष्ट करुन शालार्थातील माहिती योग्य असल्याची पडताळणी करणे आवश्यक असल्याचेही या परिपत्रकात म्हटले आहे. शाळांमधील हजेरी नोंदीची अंमलबजावणी सुरळीत व्हावी, यासाठी केंद्रप्रमुखांनी दररोज आढावा घेणे बंधनकारक असल्याचे आदेशात स्पष्ट केले आहे.

### स्वतंत्र शिक्षक उपस्थिती मॉडयूल

विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवताना विद्यार्थी उपस्थिती या टॅबवर क्लिक करुन प्रत्येक विद्यार्थ्यांच्या उपस्थिती, अनुपस्थितीची नोंद करायची आहे. एका शिक्षकाकडे एकापेक्षा जास्त इयत्ताची जबाबदारी असल्यास प्रत्येक वर्गासाठी ही प्रक्रिया स्वतंत्रपणे करावी लागेल. उपस्थिती माहिती नोंदवल्यानंतर अंतिम दाखल करा. या पर्यायावर क्लिक करून ती सबमिट करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक किंवा प्रभारी मुख्याध्यापकांसाठी ॲपमध्ये स्वतंत्र शिक्षक उपस्थिती मॉडयूल असून, त्याद्वारे सर्व शिक्षकांची हजेरी चिन्हांकीत करावी लागणार आहे.

## निवडक

### डिजिटल मार्केटिंगविषयी उद्बोधन वर्ग



**उरण :** उरण महाविद्यालयातील वाणिज्य व अकाउंटिंग फायनान्स विभागाच्या वतीने महाविद्यालयात सॅप व डिजिटल मार्केटिंग या विषयावर उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. ग्लोबल आयओटी स्कूल, नवी मुंबई या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या अभ्यासवर्गात मा.अस्मा पटेल आणि चार्टर अकाउंटंट पिंकी व मा.यश खैरे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, औद्योगिक रोजगारात सॅपची भूमिका व कार्य, डिजिटल मार्केटिंग इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. बदलत्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजंट करियर संधीसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मान्यवरांनी सांगितले. त्याचबरोबर विविध ॲपच्या माध्यमातून आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर कसा करावा तसेच डिजिटल मार्केटिंग कसे करावे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या उद्बोधन वर्गात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली होती.



### आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेरळ :** डिकसळ गावातील तरुण कार्यकर्ते रोशन साळुंखे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात परिसरातील ३५० हून अधिक लोकांनी शिबिरात उपस्थिती राहून शिबिरातील विविध वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला. आरोग्य शिबीर रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या विद्यमाने रोशन रामचंद्र साळोखे यांच्या वाढदिवसानिमित्त डिकसळ येथील रोहित मंगल कार्यालयात आरोग्य शिबीर तसेच रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मोफत शस्त्रक्रिया तसेच रक्तदाब मधुमेह तपासणी यांच्यासह जनरल तपासणी हाडांचे आजार कंबरदुखी, छाती कॅन्सर, ओरल तोंडाचा कॅन्सर, स्त्रीरोग तपासणी, बालरोग तपासणी, दात-नाक-घसा तपासणी यांच्यासह सोनोग्राफी, सिटीस्कॅन, ब्लड टेस्ट, ईसीजी एक्स-रे इत्यादी सेवा देण्यात आल्या. तसेच आळंदीची पायी वारी करणाऱ्या वारकरी संप्रदायातील वारकरी व ज्येष्ठ नागरिकांसाठी फूट म्हणजे पायाची मसाज करण्यात आली. यामध्ये अनेक वारकऱ्यांनी सहभाग दर्शवला असून पायाची मसाज करण्यात आली. यावेळी ४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून पवित्र कार्याला शुभेच्छा दिल्या.

### रेल्वे प्रवासी संघटनेचा वर्धापन दिन



**नेरळ :** मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे मेन लाईनवरील भिवपुरी रोड रेल्वेस्थानक प्रवासी संघटनेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रवासी संघाचे कार्यकर्ते आणि मध्य रेल्वेचे या स्थानकातील अधिकारी यांनी एकत्र येत वर्धापन दिन साजरा केला. मुंबई-पुणे मेन लाईनवरील भिवपुरी रोड स्टेशन स्थानक येथे प्रवाशांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी प्रवासी संघटना कार्य करीत आहे. भिवपुरी रोड रेल्वेस्थानक येथून प्रवास करणारे प्रवासी यांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रवासी वर्गाकरिता हक्काची सर्व प्रश्न सोडवण्यासाठी एक प्रवासी संघटना स्थापन करण्यात आली. ही संघटना मागील सहा वर्षांपूर्वी आसपासच्या परिसरातील लोकांनी एकत्रित येऊन स्थापन केली आहे. या कार्यक्रमावेळी स्टेशन मास्तर कबीर तसेच प्रवासी संघटनेचे पदाधिकारी नाना म्हसे यांच्या हस्ते केक कापून करण्यात आला. यावेळी रेल्वे प्रवासी संघटनेचे सदस्य, रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांची जलविद्युत प्रकल्पाला भेट




**चिपळूण :** रिगल एज्युकेशन सोसायटी संचलित रिगल आयटीआय कोंढे चिपळूण येथील विजतंत्री विभागातील विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.२२) सातारा येथील कण्हेर जलविद्युत प्रकल्पाला भेट दिली. यावेळी कण्हेर जलविद्युत प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता आर. जे. चव्हाण, सहाय्यक अभियंता स्वरदा पुजारी, सहाय्यक अभियंता अभिषेक खामकर आणि तंत्रज्ञ मनोज भोसले यांनी जलविद्युत गृहाची संपूर्ण माहिती तसेच विद्युत जनरेशन आणि वितरण कसे होते, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कण्हेर जलविद्युत प्रकल्प हे वेण्णा नदीवर असून त्याची स्थापित क्षमता ४ मेगावॅट आहे. तो मुख्यत्वे सिंचन आणि वीज निर्मितीसाठी उभारण्यात आला आहे. हा प्रकल्प सातारा आणि सांगली जिल्ह्यांसाठी सिंचनाचे मुख्य साधन आहे. या विद्युत प्रकल्पामध्ये ६.६ के. व्ही. क्षमतेची विजनिर्मिती होते. टर्बाइन फिरविण्यासाठी लागणारे पाणी पेनस्टॉक मार्फत पाठविले जाते. कंट्रोल गेट, पेनस्टॉक, व्हील ऑपरेटींग सिस्टीमची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांनी यावेळी घेतली.

### डीबीजेत एनसीसी स्थापना दिन साजरा

**चिपळूण :** चिपळूण येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने ७८ वा राष्ट्रीय छात्र सेना स्थापना दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय छात्रांनी ध्वजावंदन देऊन ध्वजास सलामी दिली. यावेळी प्राचार्य डॉ. माधव बापट, रजिस्ट्रार विजयेंद्र जाधव, मेजर नम्रता माने, लेफ्टनंट मदूसुधन माने तसेच १९ महाराष्ट्र बटालियन व ६ महाराष्ट्र बटालियन, युनायटेड इंग्लिश हायस्कूलचे १३० छात्र हजर होते. एनसीसी छात्रांना रॅंक प्रमोशन करण्यात आले. यावेळी पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्वच्छता अभियान राबविष्यात आले. नंतर महामार्गावर रस्ते सुरक्षा या अंतर्गत वाहनचालकांमध्ये सीटबेल्ट, हॅल्मेट, वेग मर्यादा, वाहतुकीचे नियम याबद्दल जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. माधव बापट यांनी एनसीसी छात्रांना कर्तव्याची शपथ दिली.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## निवडक



### ना. शं. घरतांचा सत्कार

**उरण :** उरण तालुक्यातील पुनाडे गावचे शिक्षक ना. शं. घरत यांनी सेवा काळात ज्या ज्या शाळांवर सेवा केली त्या त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरच नव्हे तर पालकांवर देखील त्यांच्या शिक्षण पध्दतीने प्रभावित केले होते. सेवानिवृत्ती नंतर ही वयाच्या ८१ वर्षीही विद्यार्थ्यांना गणित विषयात मार्गदर्शन करीत आहेत. अशा सेवेत राहणारे ते तपस्वी आहेत, असे विचार प्रा एल बी पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडले. ना. शं.पाटील यांच्या पावलां पावलांवर घडत गेलो या पुस्तकाच्या प्रकाशना समारंभात बोलत होते. या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य ग. ह. ठाकूर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक के. पां. म्हात्रे यांनी मानले तर देविदास पाटील यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले. याप्रसंगी सूर्यकांत डाकी, मच्छिंद्र घरत, एल.एन.भगत, पूर्वा प्रसाद, अभिमन्यू ठाकूर, दर्शन मोकल, द्वारकानाथ पाटील, रसिक पाटील, जनार्दन ठाकूर, अविनाश पाटील आदी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.



### सुतारवाडीत दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सुतारवाडी :** रायगड जिल्हा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या आकर्षक दिनदर्शिकाचे प्रकाशन नुकतेच सुतारवाडी येथे प्रसिद्धी प्रमुख हरिश्चंद्र महाडिक यांच्या निवासस्थानी करण्यात आले. रायगड जिल्हा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष गणेश महाडिक, माणगाव तळा अध्यक्ष मंगेश जाधव, रोहा तालुका महिला अध्यक्ष संगीता महाडिक, विजय देशमाने तसेच समाज बांधवांच्या उपस्थितीत दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### एटीएममधून परस्पर काढले पैसे



**पनवेल :** एटीएमद्वारे २० हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दत्तू नरळे हे पळस्पे गावात राहतात. ते एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. मात्र पैसे न आल्याने एटीएमच्या बाहेर थांबलेला एकाने मदतीच्या बहाण्याने त्यांचा पीन घेतला. मात्र, पैसे आलेच नाही. नरळे बाहेर गेल्यावर थोड्यावेळाने त्यांचा बँक खात्यातून पैसे काढल्याचे मेसेज आले. त्यांनी एटीएम कार्ड पाहिले असता, ते दुसरेच कार्ड होते. त्यांच्या खात्यातून २० हजार रुपये काढण्यात आले होते.

### ढाब्यावर जेवताना मोबाईलची चोरी

**पनवेल :** ढाब्यावर जेवण करण्यासाठी गेले असता, मोबाईल चोरीला गेल्याची घटना कामोठे येथे घडली. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक गुरव हे खारघर येथे राहत असून, ते त्यांचा मित्र अजय पार्ले हे म्हात्रे ढाबा, स्मशानभूमी जवळ, कामोठे याठिकाणी जेवण करण्यासाठी गेले होते. त्यांनी मोबाइल हॉटेलमधील टेबलवर ठेवला होता. जेवण केल्यावर हात धुण्यासाठी गेले, तितक्या वेळात त्यांचा मोबाईल गायब झाल्याचे लक्षात आले.



### उरण शहरात पोलिसांचे पथसंचलन

**उरण :** उरण नगरपरिषदची निवडणूक २ डिसेंबरला तर मतमोजणी ३ डिसेंबरला होत आहे. निवडणूक शांततेत पार पडावी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उरण पोलीस सज्ज झाले असून नवीमुंबई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलिसांनी शहरातून पथसंचलन केले. शांतता भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असे उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांनी सांगितले. उरणमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानासाठी तसेच ३ डिसेंबरच्या निकालासाठी उरणमध्ये ३ अधिकारी व १०० अतिरिक्त पोलीस यंत्रणा मागविण्यात आली आहे. तसेच निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात दंगल नियंत्रण पथक यांनाही तयारीस ठेवण्यात येणार आहे. उरण पोलीस आणि मोरा सागरी पोलिसांच्या वतीने संपूर्ण नगरपरिषद परिसरात पथसंचलन करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजेश खांदवे, भीमराज शिंदे, जयराम पाटील यांची टीम उपस्थित होती.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वत:ची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७
- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल.सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९०/ २२२७६१

## ७ उड्डाणपूल, २ उपसरणे ४५, जोडमार्ग उभारण्याचे नियोजन

# उड्डाणपूलाच्या कामाला वेग

। पनवेल । प्रतिनिधी ।

**कळंबोली सर्कलवरील बहुस्तरीय उड्डाणपूलाच्या कामाला वेग आला आहे. २०२६ अखेर सिग्नल-विरहित प्रवासाची तयारी करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण ७ उड्डाणपूल, २ उपसरणे आणि ४५ जोडमार्ग उभारण्याचे नियोजन आहे. त्यापैकी काही उड्डाणपूलांसाठी पाया, पाइलिंग आणि गार्डर बसविण्याची कामे सुरु आहे.**

नवी मुंबई वाहतूक व्यवस्थेचा सर्वात मोठा बदल घडवून आणणारा कळंबोली सर्कल उड्डाणपूल व इंटरचेंज प्रकल्प वेगाने सुरू आहे. सियॉनपनवेल महामार्ग, मुंबईपुणे एक्सप्रेसवे आणि एनएच-४८ या तिन्ही महत्व-पूर्ण मार्गांचा संगम असलेल्या या सर्कलवर दररोज हजारो वाहनांची वर्दळ होत असल्याने गेल्या काही वर्षांपासून कोंडी, अपघात व प्रवासातील विलंब वाढला होता. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी हा बहुस्तरीय प्रकल्प हाती घेतला आहे.

काही उड्डाणपूलांसाठी पाया, पाइलिंग आणि गार्डर बसविण्याची कामे सुरु असून सेवा रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन वळणमार्ग आणि बांधकाम क्षेत्राभोवती सुरक्षात्मक बॅरिकेड्स उभारण्यात आले आहेत. वाहतूक व्यवस्थापनासाठी पनवेल एग्झिट तात्पुरते बंद ठेवण्यात आले असून, काही मार्गांवर तात्पुरते सिग्नल व बसविण्यात आले आहेत.

### प्रकल्प २०२६ अखेरीपर्यंत कार्यान्वित

सुरक्षा नियमांचे पालन महापालिका व प्रकल्प व्यवस्थापन संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य संरचनांचे काम २०२५-२६ मध्ये टप्प्याटप्प्याने पूर्ण होईल आणि पूर्ण प्रकल्प २०२६ अखेरीपर्यंत कार्यान्वित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी येत्या काळात प्रशासनाने सुचवलेले पर्यायी मार्ग वापरावेत आणि सुरक्षा नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



कामाच्या पहिल्या टप्प्यात निर्माण झालेली कोंडी लक्षात घेऊन वाहतूक पोलीसांनी पिक अवरमध्ये अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. पर्यावरणीय बाबींना प्राधान्य देत प्रकल्प क्षेत्रातील झाडांचा मोठ्या प्रमाणावर स्थानांतर कार्यक्रम राबवला जात आहे. रोड कॉरिडॉर स्वच्छ ठेवण्यासाठी धूळ नियंत्रण, बांधकाम कचऱ्याचे व्यवस्थापन आणि जलवाहिन्यांची सुधारणा करण्यात आली आहे. नागरिक व वाहनचालकांसाठी पर्यायी मार्गांची माहिती देणारे दिशादर्शक फलक बसवून अपघाताचा धोका कमी करण्यावर भर देण्यात आला आहे.

### ■ सर्कल सिग्नल-विरहित इंटरचेंज स्वरूपात होणार कार्यरत

काम पूर्ण झाल्यानंतर कळंबोली सर्कल सिग्नल-विरहित इंटरचेंज स्वरूपात कार्यरत होणार असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी पोर्ट आणि औद्योगिक क्षेत्रांशी जोडणी मोठ्या प्रमाणात सुलभ होईल. परिणामी, स्थानिक वाहतूक, भारी वाहतूक आणि विमानतळाकडे जाणारी वाहतूक हे तीन प्रवाह स्वतंत्रपणे वाहतील. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन शहरातील व्यावसायिक व औद्योगिक गतिशीलता वाढेल, असा तज्ज्ञांचा विश्वास आहे.



## पीएनपी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रा. साईनाथ पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यामध्ये भारतीय संविधानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महत्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. श्रुती घरत, काजल पाटील, विशाल थळे यांनी भारतीय संविधानावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी भारतीय संविधानावर विवेचन करत असताना भारतीय संविधानाने दिलेले अधिकार हे किती महत्त्वाचे आहेत यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. कार्यक्रमास डॉ. रसिका म्हात्रे, प्रा. पूजा म्हात्रे, प्रा. वृषाली घरत, डॉ. अमृता कुमारी, प्रा. संजना पाटील, प्रा. संपदा शिंदे, प्रा. नितीन कराळे, प्रा. मिलिंद घाडगे, प्रा. कैलास सिंग राजपूत तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. मिलिंद घाडगे यांनी केले.

## चौलमध्ये नारळ उत्पादकांना मार्गदर्शन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नारळ विकास मंडळ कृषक कल्याणकारी संस्था चौल यांच्या संयुक्त विद्यमाने नारळ विकास मंडळाच्या विविध योजनावर मार्गदर्शन चौक मुख्य मुखरी गणपती मंदीरात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी नारळ विकास मंडळाचे उपसंचालक रविंद्रकुमार, विकास अधिकारी होते. त्यानी नारळ बागायतदारांना विविध योजनांची माहिती दिली, तसेच नारळ उत्पादन वाढण्याचे उदिष्ट डोळयासमोर ठेवून शेतकऱ्यांना खत वाटपाचा कार्यक्रम राबिण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी केले.



संस्थेचे प्रशिक्षण अध्यक्ष रविंद्र पाटील यांनी नवीन लागवड करण्याविषयी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र शासन कृषिविभाग रायगडचे अलिबाग तालुक्याचे मंडळ मंडळ अधिकारी सुर्यवंशी यांनी शास्त्रोकत्त नारळ लागवडीचे महत्व सांगितले. याप्रसंगी अनेक शेतकरी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रकाश पाटील यांनी केले.

## कृत्रिम दागिने तयार करण्याचे प्रशिक्षण



। अलिबाग । प्रतिनिधी ।

बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगडतर्फे कृत्रिम दागिने तयार करण्याचे मोफत १४ दिवसीय प्रशिक्षण १२ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगडमध्ये आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी माणगाव तालुक्यातील विळे या गावातील २५ महिलांनी सहभाग नोंदवला होता. प्रशिक्षणामध्ये ठुशी, नथ, मोत्याच्या बांगड्या, सिल्क थ्रेड दागिने बनविणे, वूडन दागिने बनविणे, फ्लॉवर दागिने बनविणे या विषयाचे सखोल ज्ञान तसेच उद्योजकता विकास, मार्केटिंग, बँकिंग, आर्थिक साक्षरता या सोबत प्रकल्प अहवाल या सर्व बाबीवर मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी परीक्षा घेण्यात आली. प्रशिक्षणार्थींना संचालक सुमितकुमार धानोरकरांनी सांगितले का, बँक ऑफ इंडिया व स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड आपल्या सोबत सदैव असेल तसेच सर्व महिलांना व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## घरफोडीत सोन्याचा ऐवज चोरीला

**पनवेल :** बेलवली येथे घरफोडी करत १५ ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि पाच हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राघो पांडुरंग पाटील हे बेलवली येथे राहत असून मुलाच्या घरी नांदिवली, कल्याण येथे गेले होते. घरी परतले असता कडी-कोंयडा तुटलेला दिसला. तसेच घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. यावेळी कपाटातील मंगळसूत्र आणि रोख रक्कम गायब असल्याने त्यांनी पोलीस तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## पोलीस ठाण्यांना आयएसओ प्रमाणपत्र प्रदान



। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई पोलिसांच्या सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आयुक्तालयाने मोठी झेप घेतली आहे. आयोजित गुन्हे आढावा बैठकी दरम्यान आयुक्त मिलिंद भारंबे यांनी परिक्षेत्रातील २२ पोलीस ठाणे आणि ११ विविध शाखांना आयएसओ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या प्रमाणित यादीत वाशी परिमंडळातील वाशी, एपीएमसी, रबाळे, कोपरखैरणे आणि रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. पनवेल परिमंडळात खारघर, तळोजा, कळंबोली, खांदेश्वर, कामोठे, पनवेल शहर आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यांना मानांकन मिळाले. तुर्भे परिमंडळातील तुर्भे एमआयडीसी, नेरूळ, एनआरआय, सीबीडी बेलापूर आणि सानपाडा पो-लीस ठाणे यांचा समावेश आहे. पोर्ट विभागात उरण, न्हावाशेवा, मोरा सागरी, उलवे पोलीस ठाण्यांना हे मानांकन देण्यात आले आहेत.

## पेडलीत पालखी सोहळा उत्साहात

**पाली /गोमाशी :** श्री क्षेत्र भैरवनाथ मंदिर पेडली ग्रामस्थ यांच्या वतीने मार्गशीर्ष शुद्ध पंचमी या तिथीप्रमाणे नुकतेच श्री भैरवनाथ महाराज पालखी सोहळा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पहाटे काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर श्रीभैरवनाथ मूर्तीचे अभिषेक, महाआरत, सत्यनारायणाची महापूजा, दुपारी महाप्रसाद, संगीतमय भजन व संध्याकाळी भैरवनाथ महाराज देवाची पालखी मिरवणूक फटाक्यांच्या आतषबाजीत मिरवणूक काढण्यात आली. वारकरी संप्रदाय विरेश्वर आसरे यांचे मोलाचे सहकार्य पालखी मिरवणुकीला लाभले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांसमवेत पंचक्रोशीतील ज्येष्ठ मंडळी यांनी हजेरी लावली होती. सायंकाळी हरिपाठ, नंतर सुधागड तालुक्यातील गणेश जागडे यांचे किर्तन झाले.

## कुंभार समाज हॉलसाठी शासकीय जागेकरिता तहसीलदारांना निवेदन

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील नगरपंचायत हद्दीतील कुंभारआळी येथील कुंभार समाजाने त्यांच्या दीर्घकाळच्या मागणीबाबत शासनाचे लक्ष वेधले आहे. वाढती लोकसंख्या, सांस्कृतिक कार्यक्रमांना वाढती मागणी आणि सामाजिक उपक्रमांचे महत्त्व लक्षात घेता कुंभार समाजाने समाज हॉल उभारण्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची अधिकृत मागणी ॲड. प्रवीण कुंभार व समाज प्रतिनिधी यांनी पाली तहसीलदारांकडे केली आहे.



कुंभार समाजामार्फत सादर करण्यात आलेल्या निवेदनात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, कुंभारआळी परिसरात राहणाऱ्या समाजाची संख्या लक्षणीय आहे. विवाह सोहळे, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक उत्सव, शैक्षणिक उपक्रम, तसेच समाज विकासाच्या बैठका घेण्यासाठी योग्य, प्रशस्त आणि स्वतंत्र सुविधायुक्त इमारत नसल्याने समाजातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत नगरपंचायत व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देण्यात आले असून कुंभार समाजाच्या सर्व बांधवांनी ही मागणी कळकळीची असल्याचे सांगितले आहे. समाज हॉल उभारला गेल्यास युवकांच्या उपक्रमांना चालना, महिलांसाठी सामूहिक उपक्रमांची सोय, तसेच स्थानिक विकास प्रक्रियेला गती मिळेल, असा विश्वास समाज बांधवांनी व्यक्त केला आहे.


> सरकारी जागेअभावी आम्हाला कार्यक्रमांसाठी बाहेर इतर जागा भाड्याने घ्याव्या लागतात. त्यामुळे आर्थिक भारही वाढतो. समाजाच्या प्रगतीसाठी एक स्वतंत्र समाज हॉल अत्यावश्यक आहे.
> -सोनाली सोनवणे, समाज महिला प्रतिनिधी

**प्रभागात अदलाबदल झाल्याने इच्छुकांची डोकेदुखी | मृत मतदारांची नावे समाविष्ट केल्याचा आरोप**

# पनवेलमध्ये मतदार याद्यांवर हरकती दाखल

। पनवेल । प्रतिनिधी ।

महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रभागनिहाय प्रारंभिक मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीबद्दलच्या हरकती व दुरुस्तीसाठी सुधारणा कार्यक्रम सुरू होता. त्यामुळे निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. प्रारुप मतदार याद्यांवर कोणाच्या हरकती अगर सूचना असल्यास त्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे सर्व संबंधित प्रभाग कार्यालय, पनवेल पालिका मुख्यालय येथे २० ते २७ नोव्हेंबर अखेर कार्यालयीन वेळेत दाखल करता येणार होत्या.



त्यानुसार पनवेल महापालिकेच्या प्रारूप मतदार याद्या जाहीर झाल्या आहेत. २७ नोव्हेंबरपर्यंत मतदार याद्यांवर हरकती घेण्यात येणार असून मंगळवारपर्यंत ३३६ हरकती दाखल झाल्या आहेत. अनेक प्रभागातील नावे विविध प्रभागात अदलाबदल झाल्याने इच्छुकांची डोकेदुखी वाढली आहे. प्रभाग क्रमांक ९ मध्ये इतर प्रभागातील तब्बल ८,५०० नावे समाविष्ट झाल्याने शेकापचे चिटणीस प्रकाश म्हात्रे यांनी हरकत नोंदवली. प्रभाग क्रमांक ६ मध्ये मृत मतदारांची नावे समाविष्ट केल्याचा आरोप मनसेचे खारघरचे पदाधिकारी गणेश बनकर यांनी केला आहे. प्रभाग २ मतदारसंघातून पनवेल महापालिका १०, ८ या ठिकाणीदेखील गंभीर चुका नोंदवल्या आहेत. प्रभाग क्रमांक १० च्या मतदार यादीत कळंबोलीमध्ये तर खारघर, कोपरा, रोडपाली परिसरातील काही नागरिकांची नावे चुकीची आहेत.

> ६६ प्राप्त तक्रारींची छाननी करून हरकतीमधील त्रुटी दूर केल्या जातील. अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यावर सर्व त्रुटी दूर करण्याचा आमचा प्रयत्न राहील. - नानासाहेब कामठे, उपायुक्त, पनवेल महापालिका

### गोंधळ कायम

पनवेल पालिकेत एकूण २० प्रभाग आहेत. असे प्रकार सर्वच ठिकाणी नोंदवण्यात येत आहेत. विरोधकांनी यावर जोरदार आक्षेप घेतला आहे. यापूर्वी दुबार मतदारांचा मुद्दा माजी आमदार बाळाराम पाटील यांनी उपस्थित केला आहे. याबाबत त्यांनी उच्च न्यायालयात देखील याचिका दाखल केली होती. तरीही मतदार याद्यांमध्ये अद्याप दुबार नावे आहेत.

### आस्थापनांच्या पत्त्यावर मतदारांची नोंद

लिटल वर्ल्ड मॉल्स, ग्लोमेक्स मॉल आणि संजीवनी स्कूल, येरळा मेडिकल सारख्या आस्थापनांच्या पत्त्यावर देखील मतदार नोंदणी झाल्याचा आरोप मनसेचे गणेश बनकर यांनी केला आहे.

## ओवी म्हात्रेचे निधन

। उरण । प्रतिनिधी ।

सामाजिक कार्यकर्ते हेमंत म्हात्रे नवीन शेवा यांची मुलगी ओवी म्हात्रे हिचे सोमवार (दि.१७) नोव्हेंबर रोजी आकस्मिक निधन झाले आहे. ओवीच्या निधनामुळे म्हात्रे परिवारावर शोककळा पसरली आहे. ओवीचे दशक्रिया विधी बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे संपन्न झाले. दिवसकार्य विधी शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी तीच्या राहत्या घरी नवीन शेवा येथे सकाळी १०:३० वाजता होणार आहे. याप्रसंगी कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक रविंद्र प्रताप सावंत व गौरव रविंद्र सावंत यांचेकडून खरेदी करणेचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन:**

**मौजे किरवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७३ | ४ | ३.४८.३७ आर.चौ.मी. (म्हणजेच ३४८.३७ चौ.मी.) | ३४.८० |

ग्रुप ग्रामपंचायत किरवली हद्दीतील सदर बिनशेती प्लॉट वरील आर.सी.सी. घर मालमत्ता क्र.२७१

या बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणत्याही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येवून आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कर्जत
दिनांक २७/११/२०२५

**अ‍ॅड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक १) श्री. प्रदीप राम कोटवानी, २) प्रवीण तुकाराम घरत, ३) मिलींद गजानन चव्हाण यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| कुरूळ, ता.अलिबाग जि.रायगड | ३६/४/अ | ०-१४-१० पो.ख. ०-०२-४० एकूण ०-१६-५० | १.३० |

वर नमूद मिळकतीचे क्षेत्र ०-१६-५० खरेदी विक्री दस्ताच्या पृष्ठर्थ सदरच्या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/११/२०२५

सही/-
**अ‍ॅड. ज्योती आर्केश पाटील**
रा. २०४, कृष्ण मंदिर, मारूती नाका,
अलिबाग बीच रोड, जि. रायगड
मो.नं. ९४२०६५१७३३/८२३७९३७९९७

दिनांक: २६/११/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे- झिराड ता. अलिबाग, जि. रायगड, १) गट नं. ४१५, क्षेत्र ०-१२-०० हे.आर., पो.ख. ०-०१-०० हे.आर, एकुण क्षेत्र ०-१३-०० हे.आर., आकार ०.१० रू.पैसे पैकी क्षेत्र ०-०९-७५ हे.आर., पो.ख. ०-०१-०० हे. आर. एकूण क्षेत्र ०-१०-७५ हे.आर., आकार ०.०८ रू. पै. २) गट नं. ४०३/१/१/२ एकूण क्षेत्र ०-८१-९० हे. आर. आकार ८.३२ रू. पै. पैकी क्षेत्र ०-२०-०० हे.आर., पो. ख. ०-०२-२५ हे.आर., एकुण क्षेत्र ०-२२-२५ हे.आर., आकार २.३२ रू. पैसे पैकी क्षेत्र ०-०२-२५ हे.आर. या भातशेती मिळकती, या मिळकतीचे विद्यमान मालक अनंत तुकाराम भाताडे रा.मु. भोकरीचापाडा पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २६/११/२०२५

**(अ‍ॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत पळस
## ता. रोहा, जि.रायगड
### निविदा सुचना

ग्रुप ग्रा.पं. पळस ता.रोहा जि. रायगड यांचे वतीने दुकानदार/ठेकेदार यांना ग्रा. पं. पळस कार्यक्षेत्रात १५ वा वित्त आयोग निधी सन २०२४/२५ २०२५/२६ बंधित /अबंधित अंतर्गत खालीलप्रमाणे वस्तू खरेदीसाठी सीलबंद कोटेशन मागविण्यात येत आहे. इच्छुकं ठेकेदारांनी/दुकानदारांनी आपली निविदा/कोटेशन बंद लिफाफ्यात बंद करून दि.०६/१२/२०२५ सायं. ५.०० वाजपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात. आलेल्या निविदा दिनांक ०८/१२/२०२५ स. ११.०० वा उघडणेत येतील यावेळी उपस्थित राहावे. एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच ग्रामपंचायतीने राखून ठेवण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | ग्रा.प. पळस हद्दीत CCTV कॅमेरे बसविणे. | ३००००/- |
| २. | ग्रा.पं. पळस येथे इनवेटर खरेदी करणे. | २००००/- |
| ३. | ग्रामपंचायत माहिती फलक बनविणे. | ३४०००/- |
| ४. | ग्रा.प.सोलार खरेदी करणे. | २२००००/- |
| ५. | ग्रामपंचायत हद्दीत ट्रायसायकल खरेदी करणे. | ४००००/- |
| ६. | ग्रामपंचायत हद्दीत सार्वजनिक कचरा कुंडी खरेदी करणे. | ५००००/- |
| ७. | पळस घनकचरा व्यवस्थापन करणे (वयक्तिक कचरा कुंडी खरेदी करणे.) | १४०१३०/- |

**अटी व शर्ती**

१) वस्तू खरेदीची वॉरंटी व करारासह दरपत्रके आवश्यक आहेत.
२) वर्क ऑर्डर प्रमाणे मालाचा पुरवठा मुदतीत पूर्ण न झाल्यास दुसऱ्या पुरवठादाराकडून साहित्य खरेदी केले जातील.
३) प्रत्येक वस्तूचे दर हे प्रती नग प्रमाणे असतील व सोबत पक्के बिल द्यावे लागेल.
४) पोस्टाने पाठविलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाही.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पळस**
**ता.रोहा, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पळस**
**ता.रोहा, जि.रायगड**

## जाहिर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही याखाली लिहलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेली जमीन आणि त्या जमिनीवरील संरचना (एकत्रितपणे **"मालमत्ता"**) यांच्या मालकी हक्काबाबत गोल्ड मिस्ट बिल्डिंग, १ला मजला, कार्टर रोड, वांद्रे, मुंबई – ४०००५० हा पत्ता असणारे **श्री. फरहान फारुक फर्निचरवाला** यांच्या अधिकाराची, शिर्षकाची, हिस्स्याची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत, कारण आमचे अशिल मालमत्ता कोणत्याही प्रकारच्या बोजा आणि दाव्यांपासून मुक्त खरेदी करण्यासाठी मालकासोबत वाटाघाटी करीत आहे.

कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांच्या सह सर्व व्यक्तींचा आणि/किंवा एन्टीटींचा मालमत्ता आणि/किंवा तीच्या कोणत्याही भागा विरोधात/वर/संदर्भात वारसा, गहाणवट, विक्री, विक्री करार, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टी, उप–भाडेपट्टी, परवाना, हिस्सा, धारणाधिकार, भार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, भेट, संपादन, मागणी, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणतेही ऋणभार किंवा फायदेशीर हित/हितसंबंध, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणताही करार किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही खटल्याअंतर्गत कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने पारित केलेली डिक्री, मनाई आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा, खटला, प्रलंबित दावे, कोणत्याही निर्णय देणा–या प्राधिकरणाची डिक्री किंवा आदेश, विनिमय, विभाजन, कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसिहत, एफएसआय, कुळ, विकसन अधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, ताबा, वितरण किंवा अन्यथा कसेही आणि कोणत्याही प्रकारचे दावे, अधिकार, मालकी हक्क किंवा हितसंबंध (**"दावे"**) असल्यास त्यांनी याद्वारे खैतान अ‍ॅण्ड कंपनी, वकिल यांना वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. रिषभ वोरा यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यांसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, ते दावे माफ केले आहेत आणि/किंवा सोडुन दिले आहेत असे मानले जाईल आणि ते मालक आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही असे समजले जाईल आणि व्यवहार त्यासंदर्भाशिवाय पुर्ण केला जाईल.

### वर उल्लेखीत अनुसूची
### (जमिनीचे वर्णन)

गाव आवास, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि वसलेले (i) गट क्रमांक २१८/१ असलेला मोजमापीत ३,५२० चौरस मिटर्स, (ii) गट क्रमांक २१९ असलेला मोजमापीत २,५३० चौरस मिटर्स, आणि (iii) गट क्रमांक २२० असलेला मोजमापीत २,४५० चौरस मिटर्स असे एकूण मोजमापीत ८,५०० चौरस मिटर्स (म्हणजेच २.१० एकर्स) जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड तसेच त्या जमिनीवर उभ्या असलेल्या संरचनेसहीत. जमिनीच्या चर्तु:सीमा खालीलप्रमाणे आहे:

i) गट क्रमांक २१८/१ असलेली जमीन
पूर्वेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१८/२ — पश्चिमेकडे किंवा त्या दिशेला: गट क्रमांक २१९
उत्तरेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २२१ — दक्षिणेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१६

(ii) गट क्रमांक २१९ असलेली जमीन
पूर्वेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१८/१ — पश्चिमेकडे किंवा त्या दिशेला: गट क्रमांक २२०
उत्तरेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २२१ — दक्षिणेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१६

(iii) गट क्रमांक २२० असलेली जमीन
पूर्वेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१९ — पश्चिमेकडे किंवा त्या दिशेला : गावातील रस्ता
उत्तरेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २२१ — दक्षिणेकडे किंवा त्या दिशेला : गट क्रमांक २१६

आज दिनांक २७ नोव्हेंबर २०२५

**खैतान अ‍ॅन्ड कंपनी करीता**
**सही /–**
**रिषभ वोरा**
**भागीदार**

## जाहीर नोटीस
### मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात

**अर्ज क्र.२५५/२०२५**

अविनाश सोनु काप
रा.बोरघर ता. माणगाव जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
बोरघर, ग्रामपंचायत पेण/तळे
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. सोनू नारायण काप यांचा जन्म/मृत्यू मौजे बोरघर ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१४-०५-१९८५ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. ०७-११-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू बोरघर येथे दि.१४-०५-१९८५ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे ? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.१४-०५-१९८५ रोजी बोरघर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे- वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील, स. नं. ५०/५३, क्षेत्र ०-०२-९३ (आर. चौ.मी.) आकार रू. ५-८६ पैसे, या मिळकतीवरील अलिबाग वेस्टेंड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं.२०२, एकूण क्षेत्र ३७.६३ चौ.मी जिचा ग्रामपंचायत वरसोली कडील मालमत्ता क्र. २४५३/५ असून, सदर निवासी सदनिका श्री. देऊ राजाराम सावंत व सौ. विठाबाई देऊ सावंत, राहणार विद्यानगर, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर सदनिका पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक २६/११/२०२५

सही/
**(अ‍ॅड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील श्री. रुपेश नामदेव यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नचिकेत अरुण कोडीलकर व इतर सहहिस्सेदार यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**

**मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नांदगाव | २/२/ई | एकूण : ०.११.०० | ०.९२ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, वगैरे कुठलाही हक्क, बोजा किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची काहीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २७/११/२०२५

**हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**अ‍ॅड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहिर सुचना
### दिव्यांग कल्याण विभाग

सन २०२५-२०२६ करीता दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग व्यक्तींना समावेशक हस्तकला व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण देणे करिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/दिकवि/९०/२०२५
दि.२६/११/२०२५

सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लालचंद गंगाधर पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे गाण तर्फे श्रीगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ७/२ | ००-०४-६५ | १.०० |
| ७/१ | ००-१९-१३ | ४.४४ |
| १० | ००-१६-७० | ३.८१ |
| १२ | ०-१६-७० | २.४६ |
| १३ | ४-९१-०० पैकी ४-३९-०० | ७.५३ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बॅका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ.एस.आय., टी.डी.आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २७/११/२०२५

**अ‍ॅड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी **श्री नरेश चिरंजीलाल अगरवाल** रा. आरएच १, मेरमेड १, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ **(जमिन मालक)** यांच्याबरोबर त्यांच्या खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती (ज्यास यापुढे **सदर मिळकती** असे संबोधले आहे) स्पष्ट, कायदेशीर आणि विक्रीयोग्य स्वामित्वाने आणि खुल्या व शांत ताबेकब्जासहीत कायम खरेदी आणि संपादन करण्यासंदर्भात वाटाघाटीने बोलणी केली आहेत.

तरी सदर मिळकती किंवा त्यांपैकी कोणत्याही जमिनी जमिन किंवा त्यांच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर त्यांच्या हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क, स्वामित्व, मालमत्ता, हिस्सा किंवा स्वारस्य व/किंवा कोणत्याही कराराव्दारे मागणी, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, कुळ, पोटकुळ, लिज, सबलिज, गहाण (इक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षिस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा, कब्जा, इजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डीवाईस), डिमाइस, वाटप, प्लेज, गॅरंटी, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, सह उदयोग, भागिदारी, कुलमुखत्यारपत्र, सहयोग, कर्ज, आगावू देणे, भुसंपादन, लेखी मागणी, बोजा, एफ.एस.आय/टि.डी.आर वापर हक्क, मनाई किंवा इतर अ‍ॅटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा, अधिका–यांचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅटयूटरी) अधिकारी किंवा लवादाचा, हुकूमनामा, आदेश, अ‍ॅवार्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहीवाट अगर लागू केलेल्या कायदयाप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत खाली सही करणार यांच्या अधोरिखीत पत्त्यावर संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर नोटीसीत नमुद जमीनी संबंधी दावा दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल.

**वर संदर्भित परिशिष्ट**
**(सदर मिळकती)**

मौजे ठाणेन्हावे, तालुका खालापूर व नोंदणी जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथील, दुय्यम निबंधक खालापूर यांचे अधिकार क्षेत्रातील शेतजमिन मिळकती **(१) सर्व्हे क्र./हिस्सा क्र २३/५** एकूण क्षेत्र ०हे–६६ आर–००पॉ समतुल्य क्षेत्र ६६०० चौ.मी पैकी **क्षेत्र ०हे–२१आर–०० पॉ समतुल्य क्षेत्र २१०० चौ. मी (२) सर्व्हे क्र./हिस्सा क्र.२३/७** क्षेत्र ०हे–१५आर–०० पॉ समतुल्य क्षेत्र १५०० चौ. मी. **(३) सर्व्हे क्र./हिस्सा क्र. २३/८** एकूण क्षेत्र ०हे–४५आर–०० पॉ समतुल्य क्षेत्र ४५०० चौ. मी **पैकी क्षेत्र ०हे–२४आर–०० पॉ समतुल्य क्षेत्र २४०० चौ. मी.**

तारीख २७/११/२०२५

**सही/–**
**लॉ पॉईंट**
**अ‍ॅडव्होकेटस अ‍ॅन्ड सॉलिसिटर्स**
ऑफिस नं. २ दुसरा मजला, निल अथर्व को ऑप हौं सोसा.दुर्गामाता मंदीरा समोर पनवेल–४१०२०६

## ग्रुप ग्रामपंचायत जासई
### मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील विकास कामे खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये ठेकेदारांकडून व मान्यता प्राप्त पुरवठा दाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉमची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जासई माऊली नगर तांडा वस्ती मध्ये संत सेवालाल बहुद्देशीय सार्वजनिक सभागृह बांधणे | बंजारा लमाण तांडा वस्तीचा विकास | ७,००,०००/ | ७,०००/- | ५००/- | ६ महिने |
| २ | सई माऊली नगर तांडा वस्ती येथिल श्री. गणेश भालेकर (घर नंबर ९९६) यांच्या घरापासून ते श्री राम दत्तू मोरे (घर नंबर १४७१) यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे | बंजारा लमाण तांडा वस्तीचा विकास | ३,००,०००/- | ३,०००/- | ५००/- | ६ महिने |

**अटी व शर्ती**

१. निविदा मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक २७/११/२०२५ ते ०३/१२/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक ठेकेदार व पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण:- जासई
दिनांक :- २७/११/२०२५

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला,**
**काळा घोडा, फोर्ट, मुंबई ०३२**

क्र.अपिल/डेस्क आरटीएस/रिव्ही/५४६/२०२५ — दिनांक :- १७/११/२०२५

**जाहिर सुचना**

प्रती,
१. श्री. नेवंदराम आईलदास करीरा
रा. १५०६, १५ वा मजला अबिएन्स कोर्ट ......अर्जदार
सेक्टर १९ डी, ए.पी.एम.सी समोर, वाशी नवी मुं-४००७०५

विरूद्ध

१. श्री. चंद्रकांत रामजी सवादकर
रा. रुम नं. ८२, कमलाकर नगर,
सॉल्ट पॅन रोड, वडाळा, मुं-४०००३७
मुळ रा. गोवेले ता. माणगांव जि. रायगड
२. श्री. रामा गोऱ्या सवादकर
३. श्रीम. राधिका गणपत सवादकर
४. श्री. अशोक पांडुरंग सवादकर
५. श्री. अनंत पांडुरंग सवादकर
६. श्री. राजु पांडुरंग सवादकर
७. श्रीम. भारती पांडुरंग सवादकर
८. श्री. अनंत विठोबा सवादकर
९. श्रीम. विद्या विठोबा सवादकर .... सामनेवाले
१०. श्रीम. अनुसया रामजी सवादकर
११. श्रीम कांता रामजी सवादकर
१२. श्री. प्रदिप आत्माराम पहेलकर
१३. श्री. महेश आत्माराम पहेलकर
१४. श्रीम. शैला आत्माराम पहेलकर
१५. श्रीम. संगिता आत्माराम पहेलकर
१६. श्री. कृष्णा रामचंद्र सवादकर
१७. श्रीम. सुजाता रामचंद्र सवादकर
१८. श्रीम. सुशिला लक्ष्मण सवादकर
१९. श्री. कृष्णा लक्ष्मण सवादकर
२०. श्री सदानंद लक्ष्मण सवादकर
२१. श्रीम. पुष्पा लक्ष्मण सवादकर क्र.२ ते २१ रा.मु.गोवेले, ता. माणगांव, जि. रायगड

विषय:- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील क्र.आरटीएस/अपिल नं. ७१/२०२२ आदेशामध्ये दि.१०/१२/२०२४ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज

अर्जदार व सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २४.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**कोकण विभाग**

## जाहीर नोटीस

निशाणी नं. — वादीचे वकील-अ‍ॅड.महेश श्रीवर्धन म्हात्रे
प्रोसेस जमा — दिवाणी चौकशी अर्ज नं.१४९/२०२५

**अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात**

१) श्रीमती मुनेरा हमीद शेख,
वय ३५ वर्षे, धंदा, गृहिणी,
२)कु.जिक्रा हमीद शेख
वय १२ वर्षे, धंदा, शिक्षण — अर्जदार
३)कु.मोहंमद सुफियान हमीद शेख,
वय १४ वर्षे, धंदा, शिक्षण,
सर्व रा.मस्जीद चाळ, मांडवी मोहोल्ला,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
(अर्जदार नं.१ स्वतः करीता व अर्जदार नं.२ व ३ यांची अज्ञान पालनकर्ता आई)

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार श्रीमती मुनेरा हमीद शेख यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात त्यांचे पती कै.हमीद दाऊद शेख हे दिनांक १८/१०/२०२४ रोजी मयत झाल्याने त्यांच्या मालकीची बजाज ऑटो लि.कंपनीची रिक्षा नं.एम.एच ०६/बी व्ही ०१०८ आहे. त्याचा इंजिन नंबर 24YWHF28744 व चेसी नं MD2A49AY8HWF11169 अर्जदार हीच्या नावावर होण्याकरीता अर्जदाराच्या नावे वारस दाखला मिळण्याचा अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास व वारस दाखल्यास कुणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दिनांक १७/१२/२०२५ रोजी मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अलिबाग यांच्या न्यायालया सकाळी १०.३० वाजता स्वतःअगर वकीला मार्फत हजर होवुन म्हणणे व कागदपत्रे दाखल करावीत. जर वरील तारखेस व वेळेत मा.न्यायालयात कुणीही हजर झाले नाहीत तर मा.कोर्ट अर्जदाराचा अर्ज मंजुर करून वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मा.कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दिली.

अलिबाग
ता.२४/११/२०२५

**क.लिपिक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

कोर्टाचा शिक्का

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक १) श्री. प्रदीप राम कोटवानी, २) प्रवीण तुकाराम घरत, ३) मिलींद गजानन चव्हाण, यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| कुरूळ, ता.अलिबाग जि.रायगड | ३६/४/अ | ०-१४-१० पो.ख. ०-०२-४० एकूण ०-१६-५० | १.३० |

वर नमूद मिळकतीचे क्षेत्र ०-१६-५० खरेदी विक्री दस्ताच्या पृष्ठर्थ सदरच्या नोटीसीचा विषय आहे.


तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २६/११/२०२५

सही/-
**अ‍ॅड. ज्योती आर्केश पाटील**
रा. २०४, कृष्ण मंदिर, मारूती नाका,
अलिबाग बीच रोड, जि. रायगड
मो.नं. ९४२०६५१७३३/८२३७९३७९९७

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारतीय संघ भुईसपाट

■ दक्षिण आफ्रिकेने मालिका जिंकली
■ भारताचा कसोटीतील सर्वात मोठा पराभव

। गुवाहाटी । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंडनंतर आता दक्षिण आफ्रिकेनेही मायदेशात कसोटी मालिकेत भारतीय संघाचा सुपडा साफ केला आहे. कोलकाता कसोटीत झालेल्या पराभवानंतर गुवाहाटीत झालेल्या गुवाहाटी कसोटीतही भारतीय संघाला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर हा सामना जिंकण्यासाठी ५४९ धावांचे भलेमोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाला भारतीय संघाचा डाव अवघ्या १०४० धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाला हा सामना ४०८ धावांनी गमवावा लागला आहे. दरम्यान या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २-० मालिका जिंकून २५ वर्षांनंतर भारतात कसोटी मालिका जिंकली आहे.**

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवत पहिल्याच डावात ४८९ धावांचा डोंगर उभारला. दक्षिण आफ्रिकेकडून फलंदाजी करताना एडेन मारक्रमने ३८, रायन रिकल्टनने ३५, ट्रिस्टन स्टब्सने ४९, तेंबा बावूमाने ४१ धावांची खेळी केली होती. या डावात सेनुरन मुथूसॅमीने १०९ आणि मार्को यान्सने ९३ धावांची तुफानी खेळी केली. यासह पहिल्या डावात ४८९ धावांचा डोंगर उभारला.



या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला पहिल्या डावात अवघ्या २०१ धावा करता आल्या. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना सलामीवीर यशस्वी जैस्वालने ५८ धावांची खेळी केली. तर केएल राहुलने २२ धावांची खेळी केली. शेवटी वॉशिंग्टन सुंदरने ४८ धावा केल्या. या दोघांना वगळलं, तर इतर कुठल्याही भारतीय फलंदाजाला हवी तशी कामगिरी करता आली नाही. त्यामुळे भारतीय संघाचा डाव स्वस्तात आटोपला.

पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेला मोठी आघाडी मिळाली. याचा दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी चांगलाच फायदा घेतला. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेकडून रायन रिकल्टनने ३५ धावांची खेळी केली. तर एडन मारक्रमने २९ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या ट्रिस्टन स्टब्सने ९४ धावा केल्या. त्यानंतर टोनी डे जोर्जीने ४९ आणि वियान मुल्डरने ३५ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिकेने दुसका डाव ५ गडी बाद २६० धावांवर घोषित केला आणि भारतासमोर विजयासाठी ५४९ धावांचे आव्हान ठेवले.

या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला एका पाठोपाठ एक मोठे धक्के बसले. यशस्वी जैस्वालने १३, केएल राहुलने ६ आणि साई सुदर्शनने १४ धावांची खेळी केली. तर ध्रुव जुरेलने २, ऋषभ पंतने १३, वॉशिंग्टन सुंदरने १६ धावांची खेळी केली.

## किंग कोहली मायदेशात परतला

**नवी दिल्ली :** कसोटी मालिकेनंतर घरच्या मैदानात खेळवण्यात येणाऱ्या ३ सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी विराट कोहली मायदेशी परतला आहे. कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधील निवृत्तीनंतर कोहली इंग्लंडमध्ये बस्तान मांडले आहे. याआधी ऑस्ट्रेलिया दौऱ्याआधी तो मायदेशात परतल्याचे पाहायला मिळाले होते. विराट कोहली रांचीमध्ये पोहोचला असून बिरसा मुंडा विमानतळावर त्याचे स्वागत करण्यात आले. ३० नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू होणाऱ्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेचा तो भाग आहे. विराट कोहली लंडनहून थेट मुंबई विमानतळावर पोहचला. कोहलीनं व्हाईट टी शर्टवर ओव्हरसाइज्ड शर्टसह काळ्या रंगातील सनग्लासेस आणि कॅपसह लूक परिपूर्ण केला होता. कोहलीनं थेट रांचीची फ्लाइट पकडल्याचे पाहायला मिळाले. २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर छोट्या फॉरमॅटमध्ये निवृत्ती घेतल्यावर इंग्लंड दौऱ्याआधी विराट कोहलीनं मोठ्या फॉरमॅटमधूनही निवृत्तीचा निर्णय घेतला आहे. परफेक्ट फॅमिली मॅन होण्यासाठी किंग कोहलीनं मध्यममार्ग स्वीकारत फक्त वनडे खेळण्याचा निर्णय घेतला आहे.

## निवडक



### रायगड संघ सुपर लिगमध्ये दाखल

**पोयनाड :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा दोन दिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने दमदार कामगिरी करत सुपर लिगमध्ये दिमाखदार प्रवेश मिळवला आहे. साखळी फेरीतील झालेल्या पाच सामन्यांमध्ये रायगडच्या संघाने दक्षिण विभाग व स्टार क्रिकेट अकॅडमी संघावर एका डावाने दणदणीत विजय मिळवला तर लातूर जिल्ह्याच्या संघावर पहिल्या डावाच्या आधारे विजयी मिळवला असून बलाढ्य अशा केडन्स क्रिकेट अकॅडमी व मेट्रो क्रिकेट अकॅडमी संघा बरोबरचा सामना अनिर्णित ठेवण्यामध्ये रायगडच्या संघाला यश आले आहे.आपल्या एच गटात रायगडच्या संघाने एकूण १९ गुण प्राप्त केले. साखळी फेरीत झालेल्या पाच सामन्यात रायगडच्या तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज आरव बरळ यांनी सर्वाधिक ४१५ धावा काढल्या त्यामध्ये दोन शतक व एका अर्धशतकाचा समावेश आहे तर अष्टपैलू खेळाडू व रायगडचा कर्णधार देव सिंग यांनी ३८७ धावा केल्या त्यामध्ये दोन शतक व एक अर्ध शतक त्यांनी केले.गोलंदाजी विभागात रायगडचा भेदक गोलंदा विराज थोरात यांनी सर्वाधिक १९ बळी घेतले त्यामध्ये एका डावात ५ बळी त्यांनी दोन वेळा घेतले आहेत,तर देव सिंग यांनी १५ फलंदाजाना तंबूचा रस्ता दाखवा आहे.

### सीएसकेच्या उर्विल पटेलचं वादळी शतक

**नवी दिल्ली :** उर्विल पटेलने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ मध्ये पुन्हा एकदा आपल्या वादळी फलंदाजीने क्रिकेट जगताला चकित केले आहे. त्याने फक्त ३१ चेंडूत शतक ठोकून एक नवीन आणि अनोखा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. उर्विल पटेल आता टी-२० क्रिकेटमध्ये ३५ पेक्षा कमी चेंडूत दोनदा शतक करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. यापूर्वी त्याने २०२४ मध्ये त्रिपुरा विरुद्धच्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये फक्त २८ चेंडूत शतक झळकावले होते. आतापर्यंत कोणत्याही फलंदाजाला अशी कामगिरी करता आली नाही. सर्व्हिसेस विरुद्धच्या सामन्यात उर्विल पटेलने सलामीला येत ३१ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या खेळीत त्याने ११ चौकार आणि ८ षटकार मारले. विशेष म्हणजे, टी-२० क्रिकेटमध्ये ३५ किंवा त्यापेक्षा कमी चेंडूत दोन वेळा शतक करणारा तो जगातील एकमेव फलंदाज ठरला आहे.



### बास्केटबॉल खेळाडूचा सरावावेळी मृत्यू

**रोहतक :** हरयाणा लाखनमाजरा या गावातील १७ वर्षीय हार्दिक राठी राष्ट्रीय बास्केटबॉल खेळाडू याच्या अंगावर बास्केटबॉलचा खांब पडला. यामध्ये त्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. हार्दिक राठीने तीन सब-ज्युनियर राष्ट्रीय आणि एका युवा राष्ट्रीय स्पर्धेत खेळला होता. त्याची बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या इंदूर अकादमीत निवड झाली होती. हार्दिक राठी अकादमीकडून फोनवरून सरावासाठी बोलावले जात होते. हार्दिक आता गावातच सराव करत होता. मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता हार्दिक अकादमीत सराव करत होता. त्यावेळी संघातील इतर खेळाडू बाजूला विश्रांती घेत होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हार्दिक उडी मारताना बास्केटचा खांब त्याच्या अंगावर पडतो. यावेळी जवळ उभे असलेले खेळाडूंनी काही सेकंदातच त्याला खांबाच्या खालून बाजूला केला. यावेळी त्यांनी लगेच त्याला रुग्णालयात दाखल केला. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.पोलिसांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच लखन माजरा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी कुटुंबाच्या जबाबावरून कारवाई केली आणि शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबाच्या ताब्यात दिला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लाखनमाजरा गावातील रहिवासी संदीप यांना दोन मुले आहेत. मोठा मुलगा १६ वर्षीय हार्दिक हा राष्ट्रीय बास्केटबॉल खेळाडू होता. हार्दिकच्या मृत्यूची संपूर्ण घटना मैदानात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.सीसीटीव्ही फुटेजनुसार, हार्दिक जमिनीवर सराव करत होता. उडी मारत असताना अचानक एक खांब हार्दिकवर पडला. त्याच क्षणी जवळ बसलेल्या खेळाडूंनी खांब उचलला. त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर गावात आणि क्रीडा जगतात शोककळा पसरली आहे.

### भारताचा बेल्जियमविरुद्ध निसटता पराभव

**मलेशिया :** सुलतान अझलन शाह चषक स्पर्धेतील पावसाचा व्यत्यय आलेल्या आणि मंगळवारी पुन्हा आयोजित करण्यात आलेल्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाने कडवी झुंज दिली. मात्र, त्यांना बेल्जियमविरुद्ध २-३ असा निसटता पराभव पत्करावा लागला..भारताकडून अभिषेक (३३ वे मिनिट) आणि शिलानंद लाकरा (५७ वे मिनिट) यांनी, तर बेल्जियमसाठी रोमन डुवेकोट (१७ वे आणि ४६ वे मिनिट) आणि निकोलस डी केरपेल (४५ वे मिनिट) यांनी गोल केले. भारताने सामन्याची सुरुवात अत्यंत निर्धाराने केली. भारतीय गोलकीपर पवनने उत्कृष्ट कामगिरी करत संघाला बरोबरीत ठेवले. सामन्याच्या दहाव्या मिनिटाला बेल्जियमला पेनल्टी कॉर्नरच्या रूपाने पहिली संधी मिळाली, त्यानंतर लगेचच दुसरी संधी मिळाली; परंतु भारतीय बचावफळीने भक्कम बचाव करत पहिला क्वार्टर गोलशून्य बरोबरीत राखला.दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने आक्रमक पवित्रा घेत अचूक पासिंगद्वारे गोल करण्याच्या संधी शोधल्या. मात्र, बेल्जियमने आघाडी घेतली. १७ व्या मिनिटाला रोमन डुवेकोट याने गोल करत पवनचा प्रतिकार मोडून काढला. भारताने सातत्याने प्रयत्न करूनही मध्यंतरापर्यंत बेल्जियमने १-० अशी आघाडी कायम राखली. दुसऱ्या सत्रात भारताने जोरदार मुसंडी मारली. ३३ व्या मिनिटाला अभिषेकने एका उत्कृष्ट चालीचे गोलमध्ये रूपांतर करत सामना १-१ अशा बरोबरीत आणला. मात्र, दुर्दैवाने ४५ व्या मिनिटाला निकोलस डी केरपेलने पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करत बेल्जियमला पुन्हा आघाडी मिळवून दिली होती.

## खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा

# पहिल्या दिवशी महाराष्ट्राच्या मुलींचा डंका

। राजस्थान । वृत्तसंस्था ।

राजस्थानमध्ये सुरू असलेल्या ५ व्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राच्या मुलींनी पदकांची लयलूट करीत दिवस गाजविला. सांगलीत चहाचा गाडा चालविणाऱ्या महादेव सलगर यांची मुलगी काजोल सलगरने सुवर्ण लिफ्टींगचा करिश्मा घडविला, तर सायकलिंग शर्यतीत आहिल्यानगरच्या अपूर्वा गोरेने कांस्यपदकाची कमाई केली.

बिकानेर येथील वेटलिफ्टिंग स्पर्धेत, शिवाजी विद्यापीठाच्या काजोल सरगरने महिलांच्या ४८ किलो गटात एकूण १५८ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. २०२२ च्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी महाराष्ट्रातील सांगलीची १९ वर्षीय काजोलने स्नॅचमध्ये मोठी आघाडी घेत अव्वल स्थान कायम राखले. सांगलीतील वालचंद महाविद्यालयात कला शाखेत दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या काजोलचे खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील हे पहिलेच सुवर्णयश आहे. तिचे वडिल महादेव सनगर हे सांगलीत चहाचा गाडा चालवितात. तिला मयूर सिंहासने, कोल्हापूरच्या डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

### सांगलीतील चहा विक्रेत्याच्या लेकीने जिंकले सुवर्ण



काजोलने दुसऱ्या प्रयत्नात ७३ किलो वजन उचलले, जे चंदीगड विद्यापीठाच्या राणी नायकपेक्षा सात किलो जास्त आहे. त्यानंतर तिने क्लीन अँड जर्कमध्ये ८५ किलो वजन उचलून सुवर्णपदकावर नाव कोरले. बेरहमपूर विद्यापीठाच्या रिंकी नायकने तिच्या तिसऱ्या प्रयत्नात एकूण ८६ किलो वजन उचलून क्लीन अँड जर्कमध्ये अव्वल स्थान पटकावले, एकूण १४९ किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले, तर राणी नायकने एकूण १४८ किलो वजन उचलून कांस्यपदक कमवले.

जयपूरमधील महिलांच्या वैयक्तिक टाइम ट्रायल सायकलिंग स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहिल्यानगरच्या अपूर्वा गोरेने कांस्यपदकाची कमाई केली. गुरु नानक देव विद्यापीठाच्या सायकलपटू मीनाक्षी रोहिलाने ००:४५:३१.९०७ वेळेसह स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक जिंकले. राजस्थानच्या पूजा बिश्नोईने ००:४६:५२.००३ वेळेसह रौप्य तर अपूर्वा गोरेने ००:४७:२४.९३३ वेळेसह कांस्य पदक जिंकून पदकाचे खाते उघडले. आहिल्यानगरमधील जनता महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असलेल्या अपूर्वा गोरेने २०२२ मधील खेलो इंडिया युवा स्पर्धेत रूपेरी यशाला गवसणी घातली होती.

## तुषार सिनलकर यांचा गौरव



। रसायनी । प्रतिनिधी ।

कुचिंग, मलेशिया येथे पार पडलेल्या १० व्या आशियाई पॅरा तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये भारतीय संघाचे प्रशिक्षक तुषार सिनलकर यांना 'सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तुषारने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा गौरव वाढविला असून, त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, सीबीडी बेलापूर येथे प्रशंसापत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

## टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी
# रोहित शर्मा ब्रँड ॲम्बेसेडर

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारताला २०२४ चा टी-२० वर्ल्डकप जिंकून देणारा कर्णधार रोहित शर्माची आगामी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे.

आयसीसी टी-२०वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड होताच रोहित शर्मा म्हणाला, मला असं सांगण्यात आलं आहे की, क्रिकेट खेळत असताना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती होणं असं क्वचितच घडतं. हे माझ्यासाठी अभिमानास्पद आहे. आशा करतो, आम्ही गेल्यावेळी केली तशी कामगिरी पुन्हा एकदा करू. आयसीसी ट्रॉफी जिंकणं खूप आव्हानात्मक असतं, १८ वर्षांच्या कारकिर्दीत जिंकलेली २ जेतेपदं माझ्यासाठी खूप खास आहेत.रोहित शर्मा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत असताना, आयसीसीच्या स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसेडर बनणारा दुसराच भारतीय खेळाडू ठरला आहे. याआधी २०११ मध्ये झालेल्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेसाठी सचिन तेंडुलकरची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली होती.



## श्रीलंकेचा टी-२० ट्राय सिरीजमध्ये पहिला विजय

। रावलपिंडी। वृत्तसंस्था ।

श्रीलंकेने टी-२० ट्राय सीरिजमध्ये पहिला विजय नोंदवला. संघाने बुधवारी झिम्बाब्वेला ९ गडी राखून हरवले. रावळपिंडीमध्ये झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजी करताना १४६ धावा केल्या. श्रीलंकेने १६.२ षटकांतच लक्ष्याचा पाठलाग केला. पथुम निसंकाने ९८ धावा केल्या. त्यानेच विजयी षटकारही मारला. झिम्बाब्वेच्या एकाही फलंदाजाला अर्धशतक करता आले नाही.



### झिम्बाब्वेला ९ विकेटने हरवले; पथुम निसंकाचा विजयी षटकार, शतक हुकले

झिम्बाब्वेने १७ धावांवर २ गडी गमावले. मरुमानी ४ आणि डायन मायर्स ६ धावा करून बाद झाले. ब्रायन बेनेटने ३४ धावा करून संघाला पन्नास धावांच्या पुढे नेले. यष्टीरक्षक ब्रेंडन टेलर १४ धावा करून बाद झाला.

कर्णधार सिकंदर रझाने नंतर रायन बर्लसोबत मिळून संघाला १०० धावांच्या पुढे नेले. रझा आणि बर्ल दोघांनीही ३७-३७ धावा केल्या. ताशिंगा मुसेकिवा ६ धावा करून नाबाद राहिला. संघाने ५ गडी गमावून १४६ धावा केल्या.श्रीलंकेसाठी वनिंदू हसरंगाने २३ धावांत २ बळी घेतले. महीश तीक्षणानेही २३ धावांत २ बळी घेतले. कर्णधार दासुन शनाकाला १ बळी मिळाला. दुष्मंथा चमीरा आणि ईशान मलिंगाला एकही बळी घेता आला नाही. १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या पाथुम निसांकाने मजबूत सुरुवात करून दिली.

## भारताला राष्ट्रकुलचे यजमानपद मिळणार


**नवी दिल्ली :** महिन्याभरापूर्वीच भारताला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळणे जवळपास निश्चित झाले होते. ग्लासगो येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ स्पोर्टच्या आमसभेत भारताच्या २०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या प्रस्तावाला औपचारिक मंजुरी मिळणार आहे. भारताने यापूर्वी २०१० मध्ये दिल्ली येथे आयोजन केले होते. यावेळी हा बहुविध क्रीडा सोहळा अहमदाबादमध्ये होणार आहे. गेल्या दशकात अहमदाबादने आपल्या क्रीडाविषयक पायाभूत सुविधांचा दर्जा युद्धपातळीवर उंचावला आहे. बुधवारी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत कॉमनवेल्थ स्पोर्टच्या कार्यकारी मंडळाने केलेल्या शिफारशीवर केवळ औपचारिक शिक्कामोर्तब केले जाईल.

## टी-२० वर्ल्ड कप स्पर्धा | एकाच दिवशी होणार ३ सामने

# ५५ धडाकेबाज सामन्यानंतर मिळणार चॅम्पियन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

टी-२० वर्ल्ड कप २०२६ चे वेळापत्रक जाहीर झाले असून यंदाचा विश्वचषक अनेक कारणांनी खास ठरणार आहे. भारत आणि श्रीलंकेत ७ फेब्रुवारी ते ८ मार्चदरम्यान तब्बल ३० दिवसांचा हा क्रिकेटचा महासंग्राम रंगणार आहे. दोन देशांतील सात शहरांमध्ये आणि आठ मैदानांवर सामने खेळले जाणार असून, टी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच काही मोठे बदल होणार आहेत.या वेळी पहिल्यांदाच २० संघ विश्वचषकात उतरतील. यामध्ये पहिल्यांदाच इटलीचा समावेश झाला आहे.



सर्व संघांना पाच-पाच संघांच्या चार गटांत विभागले गेले आहे. प्रत्येक गटातून अव्वल दोन संघ पुढे जात सुपर-८ मध्ये पोहोचतील. त्यानंतर दोन गटांमधून चार सर्वोत्तम संघ सेमीफायनलला पोहोचतील. सेमीफायनल कोलकाता, कोलंबो आणि मुंबई या ठिकाणी खेळली जाईल. अंतिम सामना अहमदाबाद किंवा कोलंबो येथे होईल.

तीन संघांनी आतापर्यंत दोन वेळा ट्रॉफी जिंकलीटी वर्ल्ड कपची सुरुवात २००७ मध्ये झाली. पहिला विश्वविजेता भारत ठरला. २०२४ मध्ये रोहित शर्माने पुन्हा भारताला विजेतेपद मिळवून दिलं आणि आता २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारत ट्रॉफी जिंकण्यासाठी मैदानात उतरणार आहे.भारत, वेस्ट इंडिज आणि इंग्लंड या तिन्ही संघांनी दोन वेळा विश्वविजेतेपद पटकावलं आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाच्या खात्यात प्रत्येकी एक विजेतेपद आहे.

### कोणत्या गटात कोणती टीम?

गट अ : भारत, पाकिस्तान, नामिबिया, अमेरिका, नेदरलँड
गट ब : ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, आयर्लंड, झिम्बाब्वे, ओमान
गट क : इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांग्लादेश, नेपाळ, इटली
गट ड : न्यूझीलंड, आफ्रिका, अफगाणिस्तान, कॅनडा, यूएई.

### भारत-पाक भिडणार

सर्व क्रिकेटप्रेमी ज्याची आतुरतेने वाट पाहतात असा सामना म्हणजे भारत विरुद्ध पाकिस्तान. हा सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये खेळला जाणार आहे. एशिया कपनंतर दोन्ही संघांमध्ये झालेल्या तिन्ही सामन्यांना मोठी प्रेक्षकसंख्या मिळाल्याने, नेही हा सामना रविवारीच ठेवला आहे.

### टीम इंडियाचे वेळापत्रक

भारत ७ फेब्रुवारीला मुंबईत अमेरिकेविरुद्ध खेळेल. १२ फेब्रुवारीला दिल्लीमध्ये नामिबियाशी सामना होईल. त्यानंतर कोलंबोमध्ये भारतपाक सामना होईल. १८ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये नेदरलँडविरुद्ध भारताचा शेवटचा सामना असेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)